म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
सं. नं. ३८२ ९०

~~निबंध~~

[illegible]

१८३२१

# उपोद्घात.

रेल्वे कंपनीची चाकरी सोडून दूर झाल्यावर आपल्या सुखदुःखाचा अनुभव रेल्वे कंपनीस व देशबांधवांस कळवावा. कारण, जोंपर्यंत मी रेल्वे कंपनीचा नौकर होतों तोंपर्यंत असें करण्यास मला सवड नव्हती व तसा मला अधिकारही पोंचत नव्हता; हें उघड आहे. परंतु, आतां मी कंपनीचे नौकरींतून दूर झालों व आमचा परस्पर श्रेष्ठकनिष्ठपणाचा व सेव्यसेवकत्वाचा संबंध सुटून मी स्वतंत्र झाल्यामुळें, तिऱ्हाईतपणें हा प्रयत्न करणें बरें वाटल्यावरून, तो मीं आपल्या अल्पबुद्धीप्रमाणें केला आहे. अशा प्रकारचा प्रयत्न आपल्या इकडे हा प्रथमचाच असल्यामुळें ह्यामध्यें मजकडून अनेक प्रकारचे प्रमाद झाले असतील. माझे स्वतःच्या सुखदुःखाचें आविष्करण ह्मणून हें अत्यल्प झालें आहे. माझेसारख्या किंवा माझेपेक्षांही कित्येक अभागी रेल्वे नौकरांच्या ज्या हकीकती मला माहीत आहेत त्यांचें आविष्करण झालें तर रेल्वे कंपनीच्या राज्यांत कसकशा प्रकारचे अव्यवस्थित कारभार चालतात, याचें विशेष दर्शन होण्याचा संभव आहे ! कल्पक कादंबरीकारांस रेल्वे खात्यांतील एकंदर कारभारांचें सुरस गोष्टींनीं व कथानकां-

नीं वर्णन करण्यास हा एक मोठा सांठाच आहे!
ज्यांस " रियालिस्टिक नाव्हेल्स " ह्मणतात
तशा प्रकारच्या खरोखर आणि यथावत् गोष्टींच्या
कादंबऱ्या, रेल्वे खात्यांतील लोकांच्या सुखदुःखानु-
भवाच्या हकीकती ऐकिल्या ह्मणजे, कुशल कादं-
बरीकारांना वेगळ्या कल्पना उढवून किंवा नवीन
कथानकें रचून लिहिण्याची जरूर पडा-
वयाची नाहीं ! रेल्वे खात्यांतील आणखी कित्येक
प्रकारचीं आविष्करणें करण्याचा माझा इरादा आहे.
परंतु हें माझें प्राथमिक आविष्करण माझे देशबंधूंस
कसें काय आवडतें तें पाहून नंतर पुढचीं आविष्क-
रणें करण्याचा माझा विचार आहे.

कित्येकांच्या मतें हा माझा प्रयत्न " खाल्लच्या-
घरचे वांसे मोजण्या " सारखा आहे असें वाटेल.
परंतु तसें नव्हे. रेल्वे कंपनीच्या हितबुद्धीनें मी
हा प्रयत्न केला आहे. येणेंकरून रेल्वे कंपनीला
तिचे नौकर लोकांच्या सुखदुःखाचें किंचित् तरी
ज्ञान व्हावें असा माझा हेतु आहे. रेल्वे कंपनीसारख्या
मोठमोठ्या कारखान्यांतून अव्यवस्था असावयाच्या-
च; परंतु त्या कशा होतात व त्या तिला दुरुस्त
करितां येतील किंवा नाहींत याचा या माझे अल्प
प्रयत्नावरून कांहीं तरी खुलासा होण्याचा संभव
आहे. रेल्वे कंपनीचा अधिकार आणि व्याप्ति ए-
खाद्या मोठ्या संस्थानाप्रमाणें आहे. मात्र नेटि-
वांच्या सुदैवयोगें सरकाराकडून तिला दिवाणी

सं. व्हे
213

फौजदारीचे अखत्यार मिळाले नाहींत. तसें झालें असतें तर ह्या खात्यांत हल्लीं ज्या अव्यवस्था व जे अन्याय चालू आहेत त्या अव्यवस्थांची व अन्यायांची परमावधि झाली असती ! ऐश्वर्याची धुंदी डोळ्यांवर येऊं देणें व्यक्तिमात्रास किंवा एका विशिष्ट समुच्चयास, दोघांनाही, अहितकरच आहे. ह्याबद्दलचा त्वरित बोध होऊन आमच्या रेल्वे कंपनीनें सावध व्हावें, एवढाच हें आविष्करण लिहिण्याचा हेतु आहे. तो हेतु कितपत सिद्धीस जातो तो आतां पाहणें आहे.

हें रेल्वे खात्यांतील सुखदुःखानुभवाचें आविष्करण करण्यास मला प्रेरणा करून उत्तेजन देणारे जे माझे मित्र आणि देशबंधु होते, त्यांत मुख्यत्वें माझे ऱ्ह मित्र व बांधव रा० रा० वामनराव बाळकृष्ण रानडे, ज्ञानचक्षूचे एडिटर, यांच्या प्रेरणेनें व उत्तेजनानेंच हा माझा प्रयत्न ह्या रूपास आला. ह्या कामांत त्यांचें मला साहाय्य नसतें तर माझ्यानें हा अल्प प्रयत्न निश्चयानें पुरा करवता किंवा नाहीं याबद्दल मला संशयच आहे. असो. रा० रानडे यांच्या ह्या निरपेक्ष साहाय्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

खं० ना० वैद्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३२१

# रेल्वे खात्यांतील नौकरीच्या सुखदुःखाचें आविष्करण.

आह्मां लोकांना आलीकडे उदरनिर्वाहास नौकरीचाकरीशिवाय दुसरा कांहीं व्यवसाय न उरल्यामुळें, थोडें बहुत इंग्रजी लिहितां वाचतां आलें ह्मणजे कोठें तरी नौकरीचाकरी धरून उपजीविका करावयास लागावें, असा क्रम आजपर्यंत चालत आलेला दिसतो. पूर्वीं इकडे नुक्ताच इंग्रजी शिकण्याचा प्रचार सुरू झाला तेव्हां, रेल्वे वगैरे खात्यांत इंग्रजी यस्, नो, करणारांची फार जरूर पडली. व त्यासाठीं इंग्रजी ३।४ बुकें झालीं ह्मणजे सहज १०।२० रुपयांची नौकरी मिळे. इकडे लोकांना दारिद्र्यानें पूर्णपणें ग्रासल्यामुळें पैसा दृष्टीस पडत नव्हता. तेव्हां, थोड्याशा विद्येला जर एवढा मोठा मुशाहिरा मिळे तर त्याचा लाभ सोडणारा कोण होता ? त्याचप्रमाणें, माझीही स्थिति झाली. ह्यापुढें मला माझा रेल्वेखात्यांतील १०।१२ वर्षांचा सुखदुःखानुभव कळवावयाचा आहे. नुक्ताच मी त्या खात्यांतील रुपेरी बिडीच्या बंधनास त्रासून, त्या अति दुःसह परवशतेंतून दूर झालों. ह्या संबंधानें माझेवर प्रेम आणि लोभ करणाऱ्या [illegible]ण्याच्या पत्रकारबांधवांनीं माझेविषयीं जे काय

दुःखेद्वार काढले त्यांवरून त्यांना मजकडून होणारी सेवा चाकरी आवडत होती असें दिसतें; व यद्यपि मी आतां त्या नौकरींतून दूर झालों आहें तथापि हेंच मोठें सर्टिफिकेट मला पुणेंकरांकडून मिळालें ह्मणून त्यांतच मी आपली कृतकृत्यता समजतों. मी नौकरीचा राजीनामा देऊन घरीं बसल्यावर माझे कित्येक मित्रांनीं आणि देशहितचिंतकांनीं मला अशा सूचना केल्या कीं, तुह्मी जर आतां कोणाचे बंदे असे राहिलां नाहीं तर, आजपर्यंत तुह्मी अनुभवलेलीं सुखदुःखें जगास कळवून, रेल्वे खात्यांत कशी काय बरी वाईट व्यवस्था आहे ती प्रसिद्ध केली असतां तिचा सर्वत्र गवगवा होऊन, त्याबद्दल रेल्वे खात्यास कांहीं तरी विचार करावा लागेल. माझे मित्रांच्या ह्या सूचनेचा मीं अव्हेर करावा हें माझें शील नव्हे. परंतु ह्या सूचनेप्रमाणें मी केल्यास त्यामुळें रेल्वे खात्यांत वरिष्ठांकडून त्या विषयीं कितीसा विचार होईल व माझे मित्रांच्या आशा कितीशा सफल होतील, ह्याविषयीं मला जबरदस्त संशय आहे. तथापि, माझ्या ह्या सुख दुःखानुभवाचे प्रसिद्धीपासून खुद्द रेल्वे खात्यांतील वरिष्ट अधिकारी कांहीं विचार करोत अथवा न करोत; निदान, तेणेंकरून, माझे देशबांधवांस त त्यासंबंधानें बरीच माहिती दिल्यासारखी होईल असें वाटून, मी माझ्या मित्रांचे ह्मणण्यास मा देऊन, त्याप्रमाणें ह्यापुढें मी आपला अनुभव नि



यपणें कळवितों. अशा प्रकारचें काम आजपर्यंत रेल्वे खात्यांतील कोणत्याही नौकरानें केल्याचें मला माहीत नाहीं. तेव्हां, माझें हें करणें एक प्रकारचें साहसच आहे, असेंही कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु असें साहस जर मी करणार नाहीं तर माझे देशबांधवांस परंपरेच्या अज्ञानांतच एक-प्रकारें ठेविल्याच्या दोषास मीं आपल्याला पात्र करून घेतल्यासारखें होणार आहे. आतां ह्यापुढें माझा जो सुखदुःखानुभव कळविण्यांत येणार आहे त्यावरून मी रेल्वे खात्याशीं कोणत्याही प्रकारें कृतघ्न होऊन, कोणीकडून तरी त्या खात्यांतल्या कृष्णकृत्यांचा स्फोट करण्याचा मीं हेतु बाळगला आहे, असें कोणींही समजूं नये. त्या खात्यानें आजपर्यंत बऱ्यावाईट रीतीनें माझा सांभाळ केला, ह्याबद्दल मी रेल्वेकंपनीचा अत्यंत आभारी आहें. आणि मी जो ह्या कृत्यास आतां प्रवृत्त होत आहें तो तरी रेल्वे कंपनीच्या हितबुद्धीनेंच होत आहे. रेल्वेकंपनीच्या खात्यांत कसकशा बऱ्या वाईट व्यवस्था आहेत त्यांचें एकवार आविष्करण झालें असतां, व त्या आविष्करणाचा कंपनीनें विचार केला तर, तिला आपल्या खात्यांत अनेक प्रकारें कमी जास्त व्यवस्था करण्यास सांपडण्याचा संभव आहे. व मी रेल्वेकंपनीच्या नौकरींतून जरी दूर झालों तरी, मीं तिची एकप्रकारें ही अप्रत्यक्ष रीतीनें सेवाच केल्यासारखी होणार आहे, असें मला वाटतें.

माझा विद्याभ्यास झटला ह्मणजे कांहीं फारसा झाला नाहीं. पुण्याच्या मिशन इंग्लिश शाळेंत ९व्या यत्तेपर्यंत अभ्यास करून नंतर पुढें तसाच अभ्यास-क्रम चालवावयाचा; परंतु कुटुंबांतील आपत्तींमुळें तो क्रम मला निरुपायानें सोडून, एकदम माझे ज्येष्ठ बंधु जबलपुराकडे आजारी होते त्यांचे शुश्रूषे-करितां जावें लागलें. ते पहिल्यानें जी. आय्. पी. रेल्वेकंपनीकडेच नौकर होते; परंतु, ज्याप्रमाणें मला ह्या खात्यांत यूरोपिअन व यूरेशियन मंडळीकडून अत्यंत तापत्रय भोगावें लागलें, त्याचप्रमाणें, माझे बंधूंनाही ह्या खात्यांत अतिशय तापत्रय भोगावें लागलें. व शेवटीं ते त्या खात्यांतून दूर झाले. हल्लीं ते नागपूर-छत्तिसगड रेल्वेकडे स्टेशनमास्तर आहेत. जी. आय्. पी. रेल्वेकडील नौकरी सुटल्यावर ते धोंड मनमाड स्टेट रेल्वेकडे स्टेशन-मास्तर होते. पुढें सरकारानें ती रेल्वे जेव्हां जी. आय्. पी. रेल्वेकडे दिली तेव्हां माझे बंधूंसही सरकारानें विचारलें कीं, तुमची खुषी असेल तर तुह्मी जी. आय्. पी. रेल्वेकडे रहा. परंतु त्यांचा निश्चय जी. आय्. पी. रेल्वेच्या बेबंद पाच्छाई-मध्यें नौकरी करावयाची नाहीं असा असल्यामुळें, त्यांणीं सरकारास कळविलें कीं, मला आपण जिकडे पाठवाल तिकडे जाण्यास माझी खुषी आहे; ह्या रेल्वेचा नौकर होऊन राहण्यास मी खुषी नाहीं. त्यावरून सरकारानें त्यांस भावनगर-गोंडाळ स्टेट

रेल्वेकडे स्टेशनमास्तर नेमिलें; व आलीकडे चार पांच वर्षांपासून, वर लिहिल्याप्रमाणें, नागपूर-छत्तिसगड रेल्वेकडे स्टेशनमास्तर आहेत. असो. त्यांणीं जी. आय्. पी. रेल्वेकडे गोऱ्या व निमगोऱ्या अधिकाऱ्यांकडून जो ताप व अपमान भोगला तसाच मलाही स्वतःला भोगावा लागल्यामुळें त्यांच्या तापत्रयाचें सर्व वर्णन माझे सुखदुःखानुभवविवेचनामध्येंच येणार आहे. ह्मणून त्याबद्दलचें वेगळें वर्णन देण्याची जरूर नाहीं.

वर लिहिल्याप्रमाणें, मी आपला शाळाक्रम बंद करून बंधूंच्या शुश्रूषेस गेल्यावर, तिकडेच वर्ष दीड वर्ष रेल्वेकडे उमेदवारी करून व रेल्वे स्टेशनावर लागणाऱ्या आवश्य कामांची माहिती करून घेतल्यावर, मोठ्या प्रयासानें मला पहिल्यानें छिंदवाडा स्टेशनावर ८ रुपयांची नंबर मार्केरची नौकरी मिळाली. अंगांतली जवानी, मार्गे संसाराचा ताप वगैरे कांहीं नव्हता, व केवळ रेल्वेकडे नौकर होऊन नांव करावयाचें अशी मला विशेष उमेद होती. रेल्वेकडच्या नौकर लोकांचे अंगीं चपलाई, धोरण, वगैरे ज्या गोष्टी अवश्य पाहिजेत त्या माझे अंगीं स्वभावतःच असल्याचा मला डौल असल्यामुळें, मीं वर लिहिल्याप्रमाणें पहिल्यानें ८ रुपयांची नौकरी स्वीकारली. हा नौकरीचे पोटांतच मी तेथील स्टेशनमास्तरचे हाताखालीं दुसरींही जबाबदारीचीं कित्येक कामें

करीत असें. त्याबद्दल मला कांहीं जास्त मुशाहिरा मिळत असे असें नाहीं. परंतु आपली हुशारी दाखवून वरिष्ठांकडून वाहवा व बढती मिळविण्याची मला मोठी हौस होती. ह्यापुढें दोन महिन्यांनीं मला दहा रुपये पगार होऊन, सुमारें एक वर्षानें १९ रुपये झाले; व मी दुसऱ्या स्टेशनावर बदलून गेलों- हें स्टेशन बऱ्हाणपूर होतें. छिंदवाडा स्टेशनावर मला ८ चे दहा झाले. मी पडेल तें हरएक लिहिण्या टिपण्याचें वगैरे चांगल्या हुशार क्लार्कांचें काम करीत असतां, मला दहा रुपटक्या पगार मिळत असे; आणि, त्याच स्टेशनावर पोर्टरांचा मुकद्दम होता त्यालाही तितकाच पगार होता. विद्येची इतकी योग्यता कमी व्हावी, आणि आमच्या जी. आय्. पी. रेल्वेनें तरी मनुष्याची योग्यता बघून त्याची योजना करण्याकडे अशा प्रकारचें उदार लक्ष्य द्यावें, हा मासला ध्यानांत ठेवण्यासारखाच आहे ! परंतु ह्याबद्दल त्या खात्यासच कां दोष द्यावा ? आह्मी गरजू, आह्मांला हौस, अथवा आमचा नाइलाज, ह्मणून, रेल्वेकंपनीच्या मतानें गुणाचेंही मोल उतरावें हें साहजिकच आहे !

बऱ्हाणपूर स्टेशनावर बदलून गेल्यानंतर मला ह्या खात्यांतील नौकरीचें सुखदुःख काय आहे तें हळूहळू नीट समजूं लागलें ! माझे दुर्दैवानें ह्या स्टेशनावर मला जे वरिष्ठ अधिकारी मिळाले ते केवळ

सुलतान पाच्छा होते! हे अस्सल गौरकाय होते! ह्यांच्या भूतदयेशीं कोणत्याही मानवी जातीच्या प्राण्याची भूतदया बरोबरी करूं शकणार नाहीं! या पशुबुद्धीच्या मानवगृहस्थाचें थोड्याशा विशेषणांनीं मी वर्णन करतों. तें इतकेंच कीं, हा मनुष्य परमावधीचा ढोंगी, मिजासी, पक्षपाती, पोस्ती आणि अत्यंत क्रूर व निष्ठुर होता! याचे हाताखालीं बहुत दिवसांचा एक उमेदवार होता. त्याला आपल्या स्टेशनावर लावून घेण्याचें त्याचे मनांत फार होतें. परंतु त्याच्या शिफारसीप्रमाणें त्या उमेदवाराची वरिष्ठांकडून नेमणूक होऊन येत नसल्यामुळें, त्यानें आपल्या हाताखालीं जे कोणी माझे जाग्यावर पूर्वीं येऊन गेले त्यांस कांहीं ना कांहीं तरी क्षुद्र कारणावरून आपल्या स्टेशनावरून बदलून टाकण्याचा प्रयत्न करावा; आणि त्या प्रयत्नाबरोबरच त्यानें आपल्या त्या आवडत्या उमेदवाराची शिफारस करावी. असा त्याचा बरेच दिवसांपासून क्रम होता, असें मला कळलें. तेव्हां मीं अशी प्रतिज्ञा केली कीं, अशा प्रकारच्या विक्षिप्त व आग्रही स्टेशनमास्तराकडून आपण तर कोणत्याही प्रकारें नांव ठेवून घेणार नाहीं. आणि, ही माझी प्रतिज्ञा शेवटास नेण्यासाठीं मी त्या स्टेशनावर श्रमपूर्वक जें पडेल तें काम इतकें बेहोष केलें कीं, तसें काम मीं पुढें कधींही आणि कोठेंच केलें नाहीं. ह्या स्टेशनावर मीं

१२।१२ तास एकसारखें काम केलें. अवश्या दिवसांत विश्रांति कशी ती कित्येक महिन्यांत घेतली नाहीं. दिवसां जेवण सुद्धां केलें नाहीं. एकभुक्त होऊन राहिलों होतों. मी सकाळच्या सहा वाजल्यापासून सायंकाळच्या सहा वाजेपर्यंत एकसारखा स्टेशनावर राहून, पडेल तें काम करीत असें. व तें सर्व आमचे दयालु स्टेशनमास्तर बघत असत. त्यांना माझी सर्व मेहनत कळत नसे असेंही नाहीं. परंतु त्या कृपामूर्तीनें मला एक दिवस देखील विचारलें नाहीं कीं, खंडेराव, तूं जेवणखाण केव्हां करतोस ह्मणून ? यूरोपिअन रेल्वे अधिकाऱ्यांची आपल्या हातांखालच्या नोकरांविषयींची ही ममता आणि काळजी सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ! ह्याप्रमाणें, मीं सुमारें १० महिने मोठ्या श्रमाची नौकरी बऱ्हाणपुर स्टेशनावर केली. तथापि, पुढें वरील परमोदार स्टेशनमास्तरांनीं आपली वाग्देवी आपल्या इच्छेप्रमाणें एकदां वरिष्ठांजवळ कांहीं तरी निमित्त सांगून पाघळलीच! आणि,त्यांणीं, मी, कामांत कुचराई करणारा,आळशी आणि आपल्या हाताखालीं काम करण्यास अयोग्य, अशी माझे संबंधानें कुरकुर नेली; व त्या कुरकुरीबरोबरच त्या साहेबानें आपल्या त्या आवडत्या उमेद्वाराचीही शिफारस केली. इतका प्रकार झाला तेव्हां मात्र मला अतिशय शीण आल्यासारखा झाला ! मी इतका अतोनात कष्ट व मेहनत



सोसून काम करीत असतां; त्या नीच पुरुषानें आपलें कुलव्रत राखिलेंच; हें पाहून, पुढें आतां ह्याचे हाताखालीं ज्यास्त दिवस राहून उपयोग नाहीं, असा मीं विचार केला. पुढें मग, मी रात्रीं दोन दोन तास तारायंत्राकडे काम शिकून त्यांत प्रवीण झालों; व बऱ्हाणपूरच्या स्टेशनमास्तराचे मडमेची विनवणी करून, तिजकडून त्या साहेबाला सांगविलें कीं, " खंडेरावाला तारायंत्राकडचें काम चांगलें येत आहे व त्याची त्या खात्यांत काम करण्याची खुषी आहे; तर त्याला तुह्मी शिफारस करून त्या खात्यांत जागा दिल्यास त्याजवर उपकार होतील. " पुढें, माझे सुदैवानें त्या मडमेचें सांगणें त्या साहेबाला मानवलें आणि त्याणें माझा अर्ज घेऊन त्याजवर आपली शिफारस केल्यामुळें, तेथून माझी खांडव्यास तारमास्तराचे जागीं तितक्याच पगारावर बदली झाली; व तेणेंकरून त्याचाही इष्ट हेतु सिद्धीस गेला.

मी इतकें झटून आणि मेहनत घेऊन काम करीत असतां बऱ्हाणपूर स्टेशनमास्तरानें आपल्या कौटिल्यानें मला अपेश दिलें व तें मला समजलें; असें असून मी गप्प बसून तें सहन कसें केलें ? व त्याबद्दल मीं ताबडतोब सर्व गोष्टींचा खुलासा स्वतंत्रपणें रेल्वे कंपनीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे कां लिहून कळविला नाहीं ? असा कित्येकांकडून प्रश्न होण्याचा संभव आहे. कारण, स्टेशनमास्तर

ह्मणजे कांहीं रेल्वेकडे मुख्यधिकारी नाहीं व तो जें ह्मणेल तीच कांहीं पूर्वदिशा नाहीं. तेव्हां मी त्याचा नीचपणा निमुटपणें सहन करून डोकें देऊन जो तेथेंच राहिलों तो माझे भीरुतेचा परिणाम होय, असाही कित्येकांकडून मला दोष येईल. परंतु ही जी मीं आपली सहनशीलता दाखविली ती माझी भीरुता नव्हे. मला वरिष्ठांकडे जें कांहीं कळवावयाचें--चार बोटें चिठ्ठी ल्याहावयाची ह्मटलें तरी--तें स्टेशनमास्तरच्या मार्फतच कळविलें पाहिजे असा ठराव असल्यामुळें, ज्या स्टेशनमास्तरच्या विरुद्ध तक्रार वरिष्ठांकडे न्यावयाची त्याचेच मार्फत ती पाठविण्याचा विचार करणें ह्मणजे, निखालस वेडेपणाचा प्रकार होता व त्यापासून उलट त्याच्या-शीं जास्त वितुष्ट संपादन केल्यासारखेंही होण्याचा संभव होता; ह्मणून तसा विचार मला मुळींच करवला नाहीं. असो. माझें भोक्तृत्व संपलें तेव्हां आपापच त्या महा नीच मनुष्याचा व माझा सहवा-स सुटला आणि मी खांडवा स्टेशनावर सुखांत जाऊन पडलों. मी बऱ्हाणपुराहून खांडव्यास बद-लून जाण्यांतच मला पहिल्यानें सुख वाटलें. कारण, मला पुष्कळ नीच लोक वरिष्ठ किंवा यजमान असे आढळतील; परंतु ह्या नीचोत्तम, दुष्ट, आणि पशु-बुद्धीच्या मनुष्यासारखा कांहीं कोणी यजमान अथवा वरिष्ठ आढळणार नाहीं, असें मला वाटलें. आणि एवढें वाटल्यानेंच मला सुखाभास झाला नाहीं;

सोनावले
२-१-३

तर खरोखरच मला त्या स्टेशनावर पुढें फार सुख झालें. तें वर्ष मीं मोठ्या आनंदांत व मजेंत काढलें. आठ तास काम पडे. पण तें मला बिलकुल त्रासदायक नव्हतें. स्टेशनावर सर्व लोक सुस्वभावी, सुशील, एकमेकांविषयीं प्रेम व वात्सल्य बाळगणारे, निर्मत्सरी, अगत्यवादी आणि निगर्वी किंवा निरभिमानी असे होते. चांगल्या गोष्टींच्या संबंधनें कोणाचाही नामनिर्देश करण्यास हरकत नाहीं. हरकत काय ती कोणाच्या दोषाविष्करणाचे संबंधानें त्याचा नामनिर्देश करण्यांत आहे. व तें काम जरा भीतीचेंही आहे. परंतु गुणशीलवंतांचा नामनिर्देश करण्यास कांहीं हरकत असण्याचें कारण नाहींच. मला ज्यांचे सहवासानें सुख मिळालें अशांचा येथें नामनिर्देश करून तूर्त मी त्यांचे संबंधानें आपले उपकार कळवितों. खांडव्यास स्टेशनवरील हेड सिग्नलर रा० रा० नरहर बाळाजी आणि त्यांचे हाताखालील दुसरे सिग्नलर बळवंत रामचंद्र जोग, हणमंत महादेव मध्व, व टिकिटमास्तर ( कोचिंगक्लार्क ) गणेश कृष्ण वगैरेंचें माझ्याशीं जें वर्तन राहिलें त्या योगानें मीं तेथें माझे दिवस फार सुखांत काढले. आपले सगेसोयरे, इष्टमित्र, आप्तस्वकीय, वगैरे सर्व एकीकडे ठेवून आपण दूरवर जातों; त्या ठिकाणीं अशी स्नेही मंडळी मिळाल्यावर मग कसलें दुःख असणार ? " उल्हासीं ओंवी आणि संतापीं शिवी; " ही कांहीं

कोणाला सुचवावी लागत नाहीं. त्याप्रमाणें मला ज्यांचेपासून सुख झालें त्यांचे संबंधानें कृतज्ञता आणि ज्यांचेपासून दुःख व ताप झाला त्यांचे संबंधानें तिरस्कार व शाप हीं सहजींच मजकडून उच्चारलीं जातील. ह्यांत नवल नाहींच. येथें मी सुमारें एक वर्षभर होतों व तो प्रोबेशनरी सिग्नलर, ह्मणजे, जबाबदारीचें काम न करणारा किंवा शिकणाऊ तारमास्तर होतों. त्यानंतर मुंबईकडे दुष्काळसंबंधानें कामाची जास्त चणचण उडाल्यामुळें, आमच्या प्रांतांतून सुमारें १९ सिग्नलर मुंबईस बोलावून नेले. जी. आय. पी. रेल्वेचे मुंबईपासून जबलपुरापर्यंत तीन भाग मानले जातात. एक जबलपूरभाग; हा भुसावळीपासून जबलपुरापर्यंत. दुसरा नांदगांवभाग; हा नांदगांवापासून भुसावळीपर्यंत. आणि तिसरा कोंकणभाग; हा मुंबईपासून नांदगांवापर्यंत. याप्रमाणें मी सदरील १९ तारमास्तरांमध्यें एक होतों; व अ ही जबलपूरभागांतून कोंकणभागांत बदलून आलों. खांडवा स्टेशनावरून बदलून मी मुंबईस आलों तेव्हां मला मजवरील सुशील व सुस्वभावी स्नेही मंडळीचा सहवास सुटल्याबद्दल फार वाईट वाटलें. व त्या स्टेशनावरील सर्व मंडळीलाही मी त्यांचेपासून दूर जातों ह्मणून फार वाईट वाटलें. मी बऱ्हाणपूर स्टेशनावरून बदलून खांडव्यास जायला निघालों तेव्हां मला अतिशय आनंद झाला होता,

व त्या आनंददर्शनार्थ मी बऱ्हाणपूर स्टेशनावर गाडींत बसतांना एक रुपयाचे पेढे वांटले. याप्रमाणें मला तें स्टेशन सोडतांना मोठा उत्साह वाटला. त्या उत्साहांतच मला खांडवा स्टेशनावर बदली मिळून मी जावयाचा असतों ह्मणजे विशेष भर पडली असती, तेवढी मात्र कमी होती. बाकी बऱ्हाणपूर स्टेशन सोडून खांडव्यास येतांना त्या स्टेशनावरील लोकांनींही माझे वियोगाबद्दलची आपली दिलगिरी फार दाखविली; परंतु त्यांच्या दिलगिरींत, मला सुख होतें ह्मणून मला त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं ! तशी गोष्ट खांडवा स्टेशन सोडतांना झाली नाहीं. मला व तेथील मंडळीला असें उभयपक्षीं एकमेकांस वाईट वाटलें; आणि त्यांतही मी जो तेथून मुंबईस बदलून आलों तो बढती होऊन नव्हे, तर तितक्याच पगारावर ! त्यामुळें तर फारच वाईट वाटलें, परंतु करावयाचें काय ? खांडवा स्टेशनावरील सर्व मंडळीचा अखेरचा निरोप घेऊन निघालों आणि मुंबईस येऊन दाखल झालों.

मुंबईस आल्यावर येथील मुख्य आफिसांतून आमच्या ठिकठिकाणीं नेमणुका झाल्या. मला बोरीबंदर स्टेशनावरच तारमास्तर नेमिलें. तेथें सुमारें १०।१२ दिवस काम केलें असेल नसेल; तो तेथून माझी बदली कल्याणास केली. व तेथेंही सुमारें तीनचार काम केलें असेल नसेल तों तेथून माझी बदली सोलापूर लाइनीवरील धोंड स्टेशनावर झाली.

आणि मी त्या बदलीप्रमाणें धोंड स्टेशनावर येऊन दाखल झालों. सारांश, बोरीबंदर किंवा कल्याण येथील अधिकाऱ्यांचे सुष्ट दुष्ट वर्तनाविषयीं कांहीं बोलतां येण्यासारखा मला अनुभव आलाच नाहीं. व ह्मणून त्या दोन्ही स्टेशनांचें संबंधानें मला कांहीं लिहितां येत नाहीं.

धोंड स्टेशनावरून मनमाड लाईन नवीनच बांधून तयार झाली होती. मात्र उतारू नेण्याआणण्याचें काम चालू झालें नव्हतें. धोंडचें स्टेशन नवीनच तयार व्हावयाचें होतें. तेथें कोणत्याही प्रकारची कायमची व्यवस्था ह्मणून बिलकुल नव्हती. स्टेशनच्या कामाचीं ऑफिसें, कामापुरते तंबू ठोकून त्यांमध्येंच केली होती. स्टेशनमास्तर, तारायंत्र आणि टिकिटांचें, हीं ऑफिसें तंबूंतच ठेविलीं होतीं. गुड्स ऑफिस व्यागन्स उभ्या करून त्यांमध्यें ठेविलें होतें. लाईन नवीनच असल्यामुळें कामाची फारच गर्दी उडून गेली होती. ऑफिसांच्या जागा व्यवस्थित नव्हत्या; कामापुरतेही लोक स्टेशनावर नव्हते व त्यामुळें कामाचा रगाडा प्रत्येकांवर फार पडे. उन्हाळ्याचे दिवस. पाण्याचें दौर्भिक्ष्य. चोहोंकडून मैदानांत उष्ण वारा सुटून तंबूचे पडदे व कनाती उडून आंत धूळ शिरे. तारायंत्राचे गतीस अवरोध होई. ब्राह्मणधर्माप्रमाणें वेळेवर स्पर्शास्पर्श न झालेलें पाणी प्यावयास मिळून जीवाला हुशारी रहावी म्हणून दुरून एक शिसा भरून पाणी आणून



त्याला बूच घालून तो शिसा ऑफिसाच्या तंबूंतच एका कोपऱ्यांत वाळूमध्यें पुरून ठेवावा; आणि मग तृषाक्रांत जीव झाला म्हणजे, तें नरम गरम पाणी पिऊन जिभेला ओलावा आणावा, असा क्रम चाले. पाण्याचा शिसा वाळूंत पुरून ठेवावयाचें कारण, तो उघड्यावर असला ह्मणजे कोणी तरी स्टेशनावरच्या ब्राम्हणेतरानें येऊन बेलाशक शिवून ते पाणी प्यावें. असा प्रकार होत असल्यामुळें पाण्याचे फार हाल होत? ह्याप्रमाणें कांहीं दिवस मोठ्या तापांत काढले. असे दिवस अनुभवलेले फारच थोडे दुर्दैवी लोक असतील! पुढें, आह्मां लोकांचे असे पाण्यावांचून फार हाल होतात असें त्या स्टेशनावरील कांट्राक्टरांनीं पाहिलें. हे कांट्राक्टर आपले पुण्यनगरस्थ, हल्लीं स्वर्गलोकवासी, रघुपतराव औरंगाबादकर हे होते. त्यांनीं धोंड स्टेशन बांधण्याचें कंत्राट घेतलें होतें. हे गृहस्थ मोठे परोपकारी आणि दयाभूत होते. त्यांनीं, वर लिहिल्याप्रमाणें, आमची पाण्याचे संबंधानें होणारी हालअपेष्टा बघून, आह्मांस असें सांगितलें कीं, "पाण्यावांचून तुम्ही आपले हाल करूं नका. माझे बंगल्यावर गार पाण्याचे रांजण भरलेले असतात त्यांतून पाणी पिऊन आपली तहान भागवीत जा." रघुपतरावांच्या येवढ्याच परवानगीची खरी किंमत किती होती व त्यांच्या परवानगीनें, त्या स्टेशनावरील आह्मां लोकांना किती सुख झालें ह्याची कल्पना, त्या

परम क्लेशकर स्थितीचा ज्या भाग्यशाली लोकांस अनुभव नसेल त्यांस होणार नाहीं. आफ्रिकेच्या किंवा अरबस्थानांतल्या रेताड प्रदेशांत पाण्याची जी किंमत ती आह्माला धोंड स्टेशनावर त्या वेळीं आणि त्या दिवसांत होती ! तेव्हां, रघुपतराव ह्यांनीं आमच्या जलपानाची उत्तम प्रकारें व्यवस्था केल्यामुळें आमचे आत्मे शांत स्थितींत त्यांनींच ठेविले, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आणि ह्या त्यांच्या औदार्याबद्दल व परोपकाराबद्दल सर्वांनीं त्यांस मनःपूर्वक दुवा व आशीर्वाद दिला असेल हें सांगायला नकोच.

दररोज ८ तासांवर काम बेहोष करावें लागे. वर मान करून विसांवा घेण्यास फुरसत नसे. सोलापूर, मुंबई व मनमाड इकडून तारांचा एकसारखा धडाका चालू असे. फक्त आह्मालाच तारायंत्र खात्यांतच असा कामाचा रगाडा असे असें नाहीं. प्रत्येकाच खात्यांत कामाची अशीच एकसारखी तारांबळ उडून राहिली होती. काम फार आणि तें आटोपण्यास माणसें थोडीं, अशामुळें प्रत्येकजणाचा जीव अगदीं मेटाकुटीस आला. नको हा त्रास आणि नको ही नौकरी, असें प्रत्येकास वाटूं लागलें ! परंतु असा तिरस्कार करून पोटें जाळण्याची सोय कशी व कोठें जमणार ? ह्मणून, तसेच दिवस लोटीत होतों. दुर्दैवाचा फेरा तरी बघा कसा तो. त्याच वेळीं धोंड स्टेशनावर महामारीचा प्रळय सुटला !



लायनीच्या व स्टेशनच्या वगैरे सर्व नव्या कामाची गर्दी उडाली असल्यामुळें, तेथें मजूर, कारागीर, कामदार वगैरे लोकांची बरीच दाटी झाली होती. पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें अस्वच्छता किती असेल हें सांगायला नकोच. आणि त्याच अस्वच्छतेचा हा परिणाम होता हेंही उघडच होतें. हा प्रलय पुढें इतका वाढला कीं, सकाळीं किंवा संध्याकाळीं गावांतून एकमेकांस भेटून कामावर गेल्यावर पुनः परत येऊन आपण एकमेकांस भेटूं कां नाहीं ह्याची काळजी असे ! क्षणाचा भरंवसा वाटेनासा झाला ! आज आपण चांगले आहोंत, परंतु उद्यां आपली काय अवस्था होईल ह्याची कोणासच खात्री नव्हती ! एके वेळेस मी आणि दुसरा एक मजसारखाच प्रोबेशनरी, असे दोघे तारायंत्र ऑफिसांत रात्रीं ६ वाजल्यापासून २ वाजेपर्यंतच्या पहाऱ्यावर काम करण्यास होतों. गांवापासून स्टेशन बरेंच लांब असल्यामुळें, प्रसंगीं मोठे हाल भोगावे लागत, त्याचा अनुभव ह्या वेळीं मला आला. माझे बरोबरीचे सोबत्यास ह्या रात्रीं ८ वाजल्यापासून जुलाब व्हावयाला लागले. सुमारें बारा वाजेपर्यंत त्याचे जुलाब चालले होते. तेव्हां मला वाटलें कीं ह्याला पटकीचा उपद्रव झाला असेल ; परंतु त्यावर औषधोपचार कसे करावे ? गांव लांब. ऑफिसांत माझ्यावांचून काम पहाण्यास कोणी नव्हतें. त्याचें आणि माझें अशीं दोघांचीं कामें मी एकटाच करणारा.

सारांश, मीं तर त्या वेळीं अगदीं घाबरून गेल्यासा-रखा झालों. काय करावें हें सुचेना. तरी माझा हा घाबरेपणा आणि काळजी मी त्या वाखाणलेल्या सोबत्यास समजूं दिलीं नाहींत. त्याला मी हुशारी येण्यासाठीं पुष्कळ दमाच्या व धीराच्या गोष्टी सांगत होतों. ह्याप्रमाणें दोन वाजेपर्यंत मीं काम केलें. तों माझे सोबत्यास थोडीशी झोंपेची गुंगी येऊन तो पडला होता, म्हणून मीही तेथेंच निजलों. गांवांत येण्याची त्याला बिलकुल ताकद नसल्यामुळें, त्याला मीं गांवांत घेऊन जाण्याचा विचार मुळींच केला नाहीं. पुढें मलाही झोंप लागली. तों सोला-पुराकडून पुण्यास डाकेची गाडी जी दोन वाजतां धोंड स्टेशनावर येते त्या गाडींत माझा तो वाखा झालेला सोबती पुण्यास येण्यासाठीं केव्हांच जाऊन बसला तें मला समजलें नाहीं. मी कामामुळें बराच श्रांत झालों असल्यामुळें मला पहांटपर्यंत जागृति आली नाहीं. पहाटे उठून बघतों तों माझा सोबती जागेवर नव्हता! त्यामुळें मला फार काळजी वाटली. पुढें तारा वगैरे करितां असें समजलें कीं, तो पुण्याकडे जाणाऱ्या डांकेच्या गाडींत बसून गेला असतां, केडगांव स्टेशनावर त्याला गाडींतून उतरलें व त्याच गांवीं तो मेला! ह्याप्रमाणें, त्या बापड्या तरुण सोबत्याची वाताहत झाली! एकदां अशी मौज झाली कीं, मी पहांटे दोनपासून १० वाजेपर्यंतच्या पाहऱ्यावर आफिसांत काम करण्यासाठीं गेलों.

मी खाणावळींतच राहत होतों. मी स्टेशनवर गेलों तेव्हां आमच्या खाणावळींतली मंडळी स्वस्थ निजली होती. परंतु मी १० वाजतां आफिसांतून खाणावळींत येतों आहें तों आमची खाणावळवाली आजीबाई वाखलून चार तासांपूर्वींच मेली होती! व गांवचे पाटील, कुळकर्णी, पोलिस, वगैरे जमून तिचा कयास होऊन, व तिची बेवारस जिंदगी ह्मणून तिच्या यादी वगैरे करीत होते. आमच्या ह्या खाणावळवाल्या आजीबाईच्या जिंदगीमध्यें आमचीं सोंवळीं भांडींही यादींत टिपलीं गेलीं होतीं! झालें, आमच्या जेवणाची त्या वेळीं वाताहत होऊन सोंवळीभांडींही जाण्याचा वेळ आला! परंतु पुढें त्या अधिकाऱ्यांस कळविल्यावर तीं आमचीं आह्मांस मिळालीं. अशा प्रकारचीं संकटें आलीं म्हणजे मनुष्याची स्थिति कशी होऊन जावी याचा विचार वाचकांनींच करावा. आतां हीं ऐहिक संकटें आहेत व तीं ज्याचे दुर्दैवानें जेथें येतील तेथें त्यांस त्यांना सादर झालें पाहिजे ही गोष्ट तर खरीच. परंतु अशा वेळीं, ज्यांना त्या संकटापासून दूर रहाण्याची सवड असते ते त्याप्रमाणें दूर रहाण्यास हयगय करीत नाहींत. ह्याचप्रमाणें, ह्या महामारीच्या संकटाचे वेळीं आह्मांलाही दूर रहातां आलें नसतें असें नाहीं. परंतु आह्मी सर्वस्वी परतंत्र पडल्यामुळें व आह्मी रेलवे कंपनीचे नौकर म्हणून बांधले गेलों असल्यामुळें आह्मांला इकडे तिकडे

स्टेशन सोडून जातां येण्याला मार्ग नव्हता. करणार
काय ? ज्यांनीं आपलें स्वातंत्र्य आपल्या हातें असें
विकून घेतलें असतें त्यांना ह्याप्रमाणें प्रसंगाला पा
देऊन तसेच दिवस काढल्यावाचून गत्यंतर नसतें !
तेव्हां त्याबद्दल तरी जास्त बोलून काय करावयाचें
आहे ?

दिवसेंदिवस स्टेशनावरील काम फार वाढत
चाललें. परंतु नियमित लोकांपेक्षां जास्त लो
स्टेशनचे कामावर कंपनीकडून नेमून पाठविण्यांत
येईनत. स्टेशनमास्तरांनीं पुष्कळ वेळां कंपनीच्या
म्यानेजराकडे रड कळवून हाताखालीं जास्त लो
पाहिजेत म्हणून आग्रहानें लिहिलें. कामाप्रमाणें
तितके लोक असले म्हणजे काम वेळेवर आ
चोखपणें पार पडतें. लोक कमी असले म्हणजे
कामाची फार फरफर होते व काळजीनें ज
काम सुरेख व बिनबोभाट वठावें तसें वठत नाहीं
ह्या गोष्टी सर्व कारखानदारांस समजत नाहींत
असें नाहींच. परंतु आमच्या रेल्वे कंपनीस कधीं
कधीं ह्या गोष्टी समजूनही ती तिकडे मुद्दाम दुर्ल
क्ष्य करून आपल्या कामदार लोकांस विनाकार
छळते, असा मला ठिकठिकाणीं अनुभव आला
आहे ! कामाच्या रगाड्याखालीं आम्ही स्टेशनावर
सर्व कामदार लोक अगदीं वांकून गेलों. अंमळ इक
डचें तिकडे डोकें करण्यास वेळ सांपडेनासा झाला
१०।१० तास काम एक सारखें पडूं लागलें



१९३२९

शिवाय कामाच्या जबाबदाऱ्या मोठ्या, यामुळें
स्टेशनमास्तर अगदीं त्रासून गेले. ट्र्याफिक सुप-
रिंटेंडेन्टच्याजवळ स्टेशनमास्तरांनीं आपल्या कुर-
कुरी अनेक वेळां कळविल्या. परंतु त्याबद्दलचा
कित्येक दिवस विचारच झाला नाहीं. त्या वेळचे
स्टेशनमास्तर रा० रा० नारायण केशव शहापूर-
कर हे होते. फारच विचारे सुस्वभावी असत. आम्ही
सर्व लोक कामाच्या ओझ्याखालीं अगदीं वांकून
गेलों असूं; तथापि, नारायणरावजींच्या भाषणानें
आणि प्रेमपूर्वक वागवून घेण्यानें त्यांनीं आमचा उ-
त्साह आणि हुरूप [illegible] ठेविला, असें म्हटल्यास
[illegible]ला नाहीं. तेच जर दुसऱ्या एखाद्या श्वानरूपी
[illegible] करणाऱ्या दुष्ट कामदारासारखे आम्हां हा-
ताखालच्या लोकांशीं हिडिस् फिडिस् करणारे अ-
सते तर मग मात्र आम्हास त्या वेळीं त्या स्टेशना-
वरील एकंदर त्रासामुळें नौकरीचे राजीनामेच देऊन
चालतें व्हावें लागतें ह्यांत संशय नाहीं. परंतु
नारायणरावजींच्या लोकोत्तर सुशीलतेनें आम्हां
सर्वांस त्यांनीं संतोषांत ठेवून आपल्याबरोबर नीट
रीतीनें वागवून घेतलें; ह्याबद्दल त्यांचे आम्हांवर
मोठे उपकार आहेत.

सुमारें सहा महिने स्टेशनमास्तरांची रड एक-
सारखी चालल्यानंतर धोंड स्टेशनावर जास्त लोकां-
च्या नेमणुका झाल्या. सर्व ऑफिसें वगैरे जेथच्या
तेथें बांधलीं जाऊन आम्हां जुन्या लोकांस काम बे-

तावातानें पडूं लागलें. अशी सर्व सुव्यवस्था होत आहे तों, एका यूरोपियन स्टेशनमास्तरची त्या स्टेशनावर नेमणूक होऊन, आह्मांवर गोरे मास्तर आले! वरा ही आमच्या कंपनीची स्वजातीयांविषयींची प्रेमबुद्धि! जोंपर्यंत कामाचा रगाडा अतिशय होता, सर्वत्र अव्यवस्था होती, आणि सर्व प्रकारचा सुरळीतपणा आणावयाचा होता, तोंपर्यंतचीं सर्व दुःखें व हाल भोगण्यास नेटिव स्टेशनमास्तरच ठेविला होता. परंतु सर्व व्यवस्था नीट रीतीनें होऊन ऑफिसांच्या वगैरे सोयी व्हाव्या तशा झाल्या, आणि कामदार लोकही वाढवून कामाचा बोजा कमी केला, तसा, तें स्वस्थतेचें सुख भोगण्यास गोरा स्टेशनमास्तर नेमून पाठविला! ज्याणें बहुत कष्ट भोगले, जबाबदाऱ्या सोसल्या, आणि सर्व सुयंत्र व्यवस्था केली, त्याला आतां ह्यापुढें जरा स्वस्थतेचें सुख भोगूं देण्यासाठीं कांहीं दिवस तरी तेथेंच राहूं द्यावयाचें होतें. परंतु तसें कंपनीकडून झालें नाहीं! हाल व कष्ट नेटिवांनीं सोसावे; आणि मागाहून स्वस्थांतःकरणानें अम्मलबजावणीसाठीं कोणी तरी साहेबबहादूर येऊन उभे रहावे! असें होणें ह्मणजे परम निरुत्साहकारक होय असें कोणीही ह्मणेल. याप्रमाणें आमचे, य पडे नारायणराव स्टेशनमास्तर हे ग्रांड स्टेशनावर स्वस्थतेचें सुख भोगून अम्मल करण्यास राहिले नाहींत. ते दुसरीकडे, खानदेशांत, बदलून गेले; आणि त्यांचे जागीं कोणी गोरे साहेब

अधिकारापन्न झाले. यापुढें त्या स्टेशनावर थोडथोड्या मुदतीनें निरनिराळे साहेब स्टेशनमास्तर होऊन आले. तेव्हां त्यांच्या सुष्टदुष्टस्वभावाविषयीं निर्णयात्मक असें कांहीं लिहितां येत नाहीं. सारांश इतकाच कीं, धोंड स्टेशनची सर्व व्यवस्था सुयंत्र झाल्यावर तेथून नेटिव कामदाराचें जें उच्चाटन झालें तें पुन्हां ह्मणून नेटिवाकडे आलें नाहीं. कोण हा अप्पलपोटेपणा आणि काय हा जात्यभिमान व वर्णाभिमान ! ! !

माझा तारायंत्रखात्यांतील अभ्यास व अनुभव जास्त वाढल्यामुळें व मी त्या खात्यांत चांगला पारंगत झाल्यामुळें रीतिप्रमाणें माझी परीक्षा होऊन मला बढती मिळाली पाहिजे होती. व ह्मणून मी ट्रॅफिक् सुपरिंटेंडेन्ट यांजकडे अर्जद्वारें कळविलें. पुढें त्यांचे हुकुमावरून तारायंत्रखात्याचे इन्स्पेक्टर एकदां माझी परीक्षा घेण्याकरितां आले व परीक्षा घेऊन गेले. मी परीक्षेंत पास होईन कां नापास होईन याबद्दल माझी खात्री होती. परीक्षेंत मी उतरलों पाहिजे व मला लवकर बढती मिळाली पाहिजे असा माझा ग्रह होता. आणि त्याप्रमाणें मी माझे बढतीची मार्गप्रतीक्षा करीत बसलों. दोन तीन महिने झाले; तरी माझे परीक्षेचा निकाल मला कळला नाहीं व बढतीची वार्ता नाहीं; असें झालें तेव्हां मी पुनः ट्रॅफिक सुपरिंटेंडेन्टकडे अर्ज करून विनंति केली. तेव्हां त्यांनीं फिरून तारायंत्रखात्यांतील

इन्स्पेक्टराला लिहून, तो पुनः माझे परीक्षेकरितां धोंड स्टेशनावर आला. त्याला मीं माझी पूर्वी एकदां परीक्षा झाली आहे वगैरे मजकूर कळविला. तेव्हां त्या गृहस्थाला त्याबद्दलची स्मृति झाली. परंतु माझ्या परीक्षेचे कागदपत्रांचा ठिकाण नव्हता ह्मणून त्या इन्स्पेक्टरानें पुनः माझी परीक्षा घेतली व मागाहून काय तो निकाल कळवितों असें सांगून तो चालता झाला. आतां तरी खास माझी परीक्षा उतरल्याबद्दल मला कळून माझी बढती होईल अशी मला खात्री व आशा वाटत होती. परंतु व्यर्थ. ही परीक्षाही पूर्ववतच व्यर्थ गेली ! आणखी तीन महिने पर्यंत मीं वाट पाहिली, परंतु कांहींच निकाल कळेना. मातक्यन् ट्र्याफिक सुपरिंटेंडेंट यांजक अर्ज केला व पुनः पूर्ववत् त्यांजकडून इन्स्पेक्टराला लिहून जाऊन मतक्यान् त्याची स्वारी माझी परीक्षा घेण्यास आली. माझे पूर्वींच्या द्विरावृत्तीचे परीक्षेच्या कागदपत्रांचाही मागच्याप्रमाणेंच ठावठिकाणा अथवा गंधवार्ताही नव्हती ! तेव्हां मला पुनः तिसऱ्यानें परीक्षा द्यावी लागली. ह्याही परीक्षेस तीन महिने होऊन गेले, तरी कांहींच निकाल कळेना. तेव्हां माझी पुनः निराशा झाली !

त्याच वेळीं धोंड स्टेशनावर सुमारें १५ दिवस पर्यंत एक गोरा स्टेशनमास्तर नवीनच आला. हा गृहस्थ पूर्वी ट्र्याफिक इन्स्पेक्टर होता. या नवीन स्टेशनमास्तरच्या कारकीर्दींत मीं जी त्याला मदत



मराठी ग्रंथ संग्रहालय

केली व त्यानें जी माझी हुशारी व चापल्य पाहिलें त्यावरून त्याला समाधान वाटलें, असें त्याचे बोलण्यावरून मला समजलें. हा गृहस्थ यद्यपि ट्र्याफिक इन्स्पेक्टर असून धोंड स्टेशनावरील मास्तर १५ दिवस रजेवर गेला असल्यामुळें त्याचें काम करण्यास आला होता तरी, त्यास तेथें कामकाजाची टापटीप नेहमींच्या सराइताप्रमाणें ठेवितां येण्यासारखी नव्हतीच. यासाठीं माझ्यासारख्या त्या स्टेशनावरील नेहमींच्या सराइताचा त्याला फार उपयोग झाला हें सांगणें नकोच. मी केवळ प्रोबेशनर ह्मणजे शिकणाऊ तारमास्तर असतां मला स्टेशनावरील एकूनएक कामाची माहिती असून त्या माहितीचा मीं त्या स्टेशनमास्तराला मदत करून त्यास उपयोग दाखविला; त्याचप्रमाणें मी प्रोबेशनरी तारमास्तर असतांही जबाबदारीचीं सर्व कामें मीं त्या स्टेशनमास्तराचे कारकीर्दींत उत्तम प्रकारें केलीं; ह्यावरून त्या मास्तरानें मजजवळ एक दोन वेळां आपले समाधानाचे उद्गार काढले. त्यावरून मीं त्या मास्तराला कळविलें कीं, यद्यपि माझी हुशारी आपल्या पसंतीस पडली तथापि, मी कित्येक दिवसांपासून प्रोबेशनरच असल्यामुळें मला कोणत्याही प्रकारें बढती मिळत नाहीं. माझे कामाच्या परीक्षा तीन वेळां तारायंत्र खात्याकडील इन्स्पेक्टर घेऊन गेले; परंतु त्याप्रमाणें माझे बढतीचा विचार मुळींच होत

नाहीं. व यामुळें मला वाटावी तशी हुशारी
उत्तेजन वाटत नाहीं. तीन वेळां माझ्या परीक्ष
घेऊन इन्स्पेक्टर कागद घेऊन गेले ते गेले; त्या
बद्दलची वार्ताही कळत नाहीं. याला काय क
रावें ? माझें हें बोलणें ऐकून त्या स्टेशनमास्तराल
फारच अश्चर्य वाटलें. तो ह्मणाला, ही गो
मला तुह्मीं अगोदरच कां नाहीं कळविली ? मल
वाटलें, तुह्मी कायमचे तारमास्तर आहांत. अ
ह्मणून त्यानें मजकडून एक अर्ज लिहून घेतला
आणि तो त्यानें आपल्या वरिष्ठांकडे पाठविला
तों पुढें ८ दिवसांतच मला बढतीची नेमणूक लिहू
आली ! ह्याप्रमाणें मला त्या वेळेपासून पुढें २० र
पये पगार झाला.

माझी वर लिहिल्याप्रमाणें तीन वेळां परीक्ष
झाल्याचें जें लिहिलें आहे त्याविषयींचीही थोडी
गंमत कळवावयाची आहे. दुसऱ्या वेळेस जेव्हां
ट्रॅफिक सुपरिंटेंडेंटच्या हुकुमावरून टेलिग्रा
इन्स्पेक्टर माझे परीक्षेसाठीं आले तेव्हां त्यांणीं म
पाहून असा प्रश्न केला कीं, तुमची परीक्षा मीं पू
एक वेळां घेतली असतां, आतां पुनः कशास
घ्यावयाची ? तेव्हां मीं त्यांना कळविलें कीं, त
परी प्रमाणें मला अजून बढती मिळाली नाहीं
"बरें तर मग; आतां पुनः एकवार परीक्षा घेऊ
पूर्वींचे कागद वगैरे कोठें गैरविल्हेस लागले अ
तील यासाठीं ताजीच परीक्षा घेऊन वरि



ष्ठांकडे कळवितों " असें ह्मणून त्यांणीं, वर लिहि-
ल्याप्रमाणें दुसऱ्यानें माझी परीक्षा घेतली. परंतु
पुनः त्या परीक्षेचीही वाताहात वर लिहिल्याप्रमाणें
होऊन, मात्कयान् तिसरे खेपेस जेव्हां तेच इन्स्पे-
क्टर माझे परीक्षेस आले, तेव्हांही त्यांना मी पूर्वी-
च्या ओळखीचा आढळून, पुनः त्यांणीं मला पूर्व-
वतच प्रश्न केला. व तेव्हांही मात्कयान् आपले
कागदपत्र ताजेतवाने करून घेण्यासाठीं त्यांणीं
माझी तिसऱ्यांदा परीक्षा घेतली, तरी त्या खेपेची
दशा पूर्वींच्या दोन खेपांप्रमाणेंच झाली, हें वर
लिहिलें आहेच. शेवटीं, जेव्हां स्टेशनमास्तरानें
स्वतः त्या कामांत मन घातलें तेव्हां ८ दिवसांत
काम झालें ! ह्याप्रमाणें, कंपनीच्या दरबारांत किती
अंदाधुंदी आहे तिचा मला पूर्ण अनुभव आला.
माझेसारख्या उमेदवाराची अशी महिनोंगणती
फरफर होणें ह्मणजे ती कंपनीच्या कारभारांतली
सुव्यवस्था दाखविते किंवा अव्यवस्था दाखविते,
याचा विचार वाचकांवरच सोंपवितों. आपल्या हा-
ताखालच्या लोकांचें जीवन जाणण्याची मानवी
बुद्धि जणूं काय आपल्या रेल्वे कंपनीचे अधिका-
ऱ्यांस देवानें दिलीच नाहीं असें ह्मटलें तरी कांहीं
बाध येईल असें वाटत नाहीं !

बढतीच्या जागेचे सुमारें तीन महिने धोंड स्टे-
शनावर काम केल्यावर माझी पुण्यास बदली झाली.
इतके दिवस मागें कुटुंबपाश वगैरे कांहीं नव्हता.

पुण्यास आल्यावर कुटुंबाची काळजी मागें लागल्य
मुळें वीस रुपयांमध्यें निर्वाह होण्याची मारामार
होऊं लागली. दिवसेंदिवस कुटुंबविस्तार हो
चालला, व त्या मानानें संसार संबंधी गरजा
खर्च अधिक, वाढून जास्त पैसा मिळविण्याकडे वि
शेष लक्ष्य ओढूं लागलें. परंतु जास्त पैसे मिळा
कसे ? पुष्कळ दिवस देव देव करितां नवसां साय
सांनीं १९ चे २० झाले. तेव्हां इतक्यांत, आपल
गरजांप्रमाणें लागलीच आपल्याला बढती को
ठेविली होती ? शेवटीं पैसे मिळविण्याची एक युक्ति
सुचली. रेल्वेखात्यांत कोणी आजारी मनुष्य असेल
किंवा कोणी रजेवर गेला असेल, तर त्याचे जा
त्याचें काम करण्यास ह्मणून कंपनीकडून दररो
८ आणे जादा मुशाहिरा मिळून, रजेवर जाण
रांची किंवा आजारी असलेल्यांचीं कामें करण्या
पाठवितात. तेणेंकरून प्रत्येकास दरमाहा १
रुपये जास्त पगार पडतो. तेव्हां, अशा प्रकार
जादा नोकरी करून जादा पगार मिळविण्या
मीं योजना केली. कंपनी ह्याप्रमाणें जो ८
रोजीचा भत्ता देते त्यांत तिचा फायदाच असतो
कंपनीकडून खाजगी जरूरीच्या कामाकरितां किं
आजारीपणाचे संबंधानें रजा कशी मिळते, वगैरे
माहिती रेल्वेकडे नोकरी न केलेल्यांस माहि
नसेल, ह्मणून ती माहितीही थोडक्यांत सांगतों. ए
वर्षाच्या अविच्छिन्न नोकरींत कंपनीकडून, सव



असेल तर मेहेरबानीनें भरपगारी १० दिवसांची रजा मिळते. रेल्वे कंपनीच्या खात्यांत रविवार, सण, वार किंवा विशेष उत्सव असले तरी कधींही सुट्टी मिळत नाहीं, हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेविलें पाहिजे; आणि अशा रीतीनें सतत वर्षभर काम केल्यावर आणि कंपनीला रजा देण्यासारखी सवड असली ह्मणजे मग, वर लिहिल्याप्रमाणें १० दिवस भरपगारी रजा मिळाली तर मिळते. याचप्रमाणें आजारीपणाचे संबंधानेंही रजेची अडचणच आहे. डाक्टरचें आजारीपणाबद्दलचें सर्टिफिकेट कंपनीकडे हजर केलें तर एक महिनाभर अर्धपगारी रजा मिळते ! परंतु तितक्या मुदतींत आजारी मनुष्य बरा झाला नाहीं तर त्याला बिनपगारीच घरीं बसावें लागतें; आणि अशा रीतीनें रजेवर असलेल्यांचे पगार अर्थात् कंपनीला खिशांत टाकायला सांपडतात. आणि ह्या पगारांतूनच वर लिहिल्याप्रमाणें जादा काम करणारांस कंपनी रोज आठ आणे भत्ता देते. ह्यावरून असें करण्यांत कंपनीचा फायदाच असतो. कारण, आजारी किंवा रजेवर असणाऱ्या मनुष्यांचे पगार सबंध कंपनीच्या पेटींत राहून, त्यांचेबद्दल वेगळीं स्वतंत्र मनुष्यें न लावतां, दुसऱ्या नौकरांसच त्यांना समाधान वाटेल अशा बेताचा रोजचा भत्ता देऊन त्यांजकडून कामें उरकून घेण्यांत येतात. भत्त्याचे रूपानें काय दहा पंधरा

रुपये खर्च होतील तेवढे होतील. बाकीचे पैसे तरी निदान कंपनीच्या पेटींत पडतात ! असो.

ह्याप्रमाणें भत्त्यांचीं कामें करण्याची मीं सुरुवात केली व त्यामुळें मला माझे मूळ पगारापेक्षां दहा पंधरा रुपये जास्त मिळण्याचा संभव होता. परंतु हें माझें करणें तुपाच्या लालचीनें उष्टें खाण्यासारखें होतें. अशीं जास्त कामें करण्यांत श्रम, कष्ट आणि जबाबदाऱ्या फार असतात; परंतु त्याबद्दल-चा मीं आपले तारुण्याच्या भरामध्यें कांहींच विचार केला नाहीं. तारायंत्र खात्यांतील कोणत्याही नौ-कराकडून आपल्या कामांत कांहीं हयगय, कसूर अथवा अज्ञानपणा झाल्यास त्याजवर कंपनीनें बेलाश क फौजदारी खटला करावा असा एक ठराव ह्याच वेळीं कंपनीनें काढून, तो ठराव आह्मास पसंत आहे अशा अर्थानें त्याजवर तारायंत्र खात्यांतील एकंदर लोकांच्या सह्या घेतल्या. अशा प्रकारचे घातुक ठराव करून त्यांजवर आपल्या हाताखालच्या नौ-कर लोकांची आपल्या अप्रत्यक्ष वजनदारीनें संमति मिळविणें ह्मणजे रेल्वे कंपनीचा आपल्या पदरच्या नौकर लोकावर निखालस जुलूम आहे,असें कोणीही कबूल करील. आपणच नाहीं नाहींत ते ठराव करावयाचे आणि त्यांजवर आपल्या नौकर लोकां च्या संमतीच्या सह्या मिळवून ते ठराव सर्वांना नाकबूल आहेत असें दाखवावयाचें; ह्यामध्यें

किती न्याय व थोरपणा आहे हें वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. असल्या जुलमी व अन्यायी ठरावांवर जर नौकर लोक सह्या करणार नाहींत तर अर्थात् त्यांस आपल्या नौकरीवरून दूर होण्याचे प्रसंग यावयाचे. तेव्हां,वर ह्मटल्याप्रमाणें, आपल्या अप्रत्यक्ष रीतीच्या वजनामुळें, कंपनी आपल्या मनस्वी ठरावांवर आपल्या नौकर लोकांची कशी संमति मिळविते ह्याचा हा एक मासला दाखविला. पोटार्थी लोकांना आपल्या नौकरीची जरूर असल्यामुळें ते बापडे कंपनीच्या मलभळत्या ठरावांवर आपल्या संमतीच्या दर्शक सह्या करतील ह्यांत नवल तें कोणतें ? आणि अशा रीतीनें मिळविलेली संमति ह्मणजे आपल्या ठरावांची सर्वमान्यता दाखविण्याचा रेल्वे कंपनीचा डौल किती यथार्थ असतो हेंही समंजस व विचारी लोकांनीं ध्यानात वागविण्यासारखें आहे. अशा प्रकारच्या संमतीच्या सह्या करणारांमध्यें मीही एक होतों, व अर्थात् त्या समतीवरून माझेवर मोठी जबाबदारी होती, व त्या बद्दलची मी मनात भीतिही बाळगायला पाहिजे होती; परंतु पैशाच्या ओढीनें मीं ती जबाबदारी व भीति मुद्दाम आपल्या स्मरणाआड टाकली. यांत माझा कोता विचार ह्मणा किंवा रेल्वे कंपनीचा आपल्या निराधार नौकर लोकांस अशा नानाप्रकारांनीं छळण्याचा हेतु ह्मणा. धगधगलेल्या अग्निकुंडाचे कांठावर सोन्याचा गोळा ठेवायचा, त्या

कुंडाची धग दाहा हातांवर उभे राहणारे मनुष्यास देखील क्षणभर सहन करवत नाहीं, आणि त्या कुंडाचे कांठावरला तो सोन्याचा गोळा जो उचलील त्यास बक्षीस देण्याचा पण लावायचा. असें करण्यांत मग त्या लोभी किंवा दारिद्र्यग्रस्त मनुष्याचे जीवास कांहीं धोका होईल किंवा काय याबद्दलचा विचार करावयाचा नाहीं. अशांतलाच कांहीं प्रकार आपल्या रेल्वे कंपनीकडून होत असल्याचें वरील एकंदर खुलाशावरून लक्ष्यांत येईल. कामाच्या जबाबदाऱ्या व भीति पुष्कळ ठेवावयाच्या; आणि दुसरीकडे आमिष ठेवून तिकडे दरिद्री लोकांची ओढ लागावी अशीही तजवीज करावयाची, तेव्हां अशा करण्यास काय ह्मणावें ? असो. मला तर लोभ स्वीकारून जबाबदारीचा तादृश विचार न करण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. मग असें करण्यांत माझा कितपत अविचार होत असे व त्याबद्दल माझे देशबांधव मला काय दोष देतील तो भाग मी मुळींच एकीकडे ठेवितों. रेल्वे कंपनीच्या अशा करण्यांत निव्वळ छळवादाशिवाय दुसरा कांहीं हेतु नाहीं एवढेंच माझे मतानें वाटतें. मी तर जीवाचें नांव जिवडा ठेवून भत्त्याचे आशेनें जादा काम करण्याचा सपाटा चालविला. परंतु माझ्या ह्या हुडपणाचा परिणाम मला एक दोन वर्षांतच कळून आला. माझी पहिली हुशारी, तरतरी, हुरूप, सामर्थ्य आणि जोरदारपणा हीं माझीं मलाच कमी झाल्याचें

समजूं लागलें. मनुष्याला अविश्रांति आणि निद्राभाव हे केवळ मृत्यु होत. परमेश्वरानें जीवमात्राच्या सुखस्वास्थ्याकरितां रात्र ही एक अमोल देणगी देऊन ठेविली आहे. तिच्या योगानें प्राणीमात्रांनीं सर्व दिवसभर सोसलेल्या श्रमकष्टांपासून विराम पावावा व पुनः दुसरे दिवसाकरितां आपले श्रम व कष्ट करण्यास ताजेंतवानें व्हावें, अशी परमात्म्याची योजना सयुक्तिक आणि अवश्यक आहे. परंतु आह्मी ज्ञानवान् ह्मणविलेले मानवप्राणी लोभाला, व्यसनाला किंवा नादाला गुंतून अविचारी व आत्महितशत्रु होतों, हें आमचें किती मूर्खपण आहे बरें? कारखानदारांनीं किंवा त्यांच्या नोकरांनीं लोभाला वश होऊन रात्रंदिवस कामें करून घेण्यांत किंवा करण्यांतच आपल्या कर्तव्याची सार्थकता मानणें, व्यसनी किंवा नादी लोकांनीं रात्रींच्या रात्रीं नाटकें, तमाशे अथवा इतर कांहीं असेच भाग आपल्या करमणुकीचीं साधनें असें समजून त्यांमध्यें घालविणें, या गोष्टी ह्मणजे निखालस सृष्टिनियमाच्या विरुद्ध आपलें वर्तन ठेवून आपला घात करून घेण्यावांचून दुसरें कांहीं नाहीं. भव्याच्या आशेनें आणि शरीरसामर्थ्याच्या डौलांत मीं आपल्या किती रात्रीं अविश्रांतपणें कावाडकष्टांत घालविल्या असतील? अशा अविचारानें मी आणखी कांहीं दिवस तसाच चाललों असतों तर खरोखर मी आपल्याला लवकरच

वार्धक्य आणि जराग्रस्तता आणिली असती. परंतु, त्याबद्दल मी पुढें लवकरच उमजून सावध झालों व भत्त्याचा लोभ हळू हळू सोडून देऊं लागलों. असें झालें तरी रेल्वे कंपनी कोठें आम्हाला सुखानें चैन पडूं देत होती ! कंपनीकडून मला बरेच वेळां ह्या जादा कामावर जाण्याविषयींचे हुकूम होत व ते कंपनीच्या ठरावाप्रमाणें आम्हाला पाळणें भागच होतें. नाहीं तर आम्ही कंपनीच्या शासनास किंवा तिजकडून आपल्यावर खटले करवून घेण्यास पात्र होतों. ह्या संबंधानें कंपनीच्या नौकरांस कसा त्रास भोगावा लागतो व त्या कामांत बिचाऱ्या पोटबाबू नौकरांचा कसा नाइलाज होतो, ह्याबद्दलचें माझें स्वानुभूत असें ह्या वेळीं एखादें उदाहरण दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं.

मी पुण्याचे स्टेशनावर तारमास्तर असतां, एके दिवशीं, सकाळचे १० वाजल्यापासून सायंकाळीं सहा वाजेपर्यंत मीं काम केलें असून, मला एकदम हुकूम आला कीं, चिंचवडचा असिस्टंट स्टेशनमास्तर आजारी असल्यामुळें तेथें रात्रपाळीचे कामासाठीं तुम्ही तावडतोब निघून जा. मी माझ्या वरिष्ठांस कळविलें कीं, मी सकाळपासून एकसारखा काम करण्यांत दमून गेलों आहें; तर, माझेबद्दल येथें रात्रपाळीचें काम करणाऱ्यासच तिकडे पाठविल्यास मला त्रास होणार नाहीं. परंतु माझी ही सकारण विनंति ऐकावी असे रेल्वे खात्यांतील अधिकारी भूतदयावान्

असल्यावर मग रेल्वे कंपनीच्या खात्यास नांवें कोण बरें ठेवील ? तेव्हां, जणूं काय, तें सर्व लोकांकडून नाव ठेवून घेण्याचें ब्रीद कायम राखण्याकरितांच माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं माझेकरितां आपली शिफारस वगैरे जास्त न खर्चतां मला सांगितलें कीं, हुकुमाप्रमाणें तुह्मालाच गेलें पाहिजे. नाहीं तर हुकूम अमान्य केल्याबद्दलच्या शासनास तूं आपल्याला पात्र करून घेशील. त्याबद्दलचा दोष मजकडे कांहीं नाहीं. इतकें ऐकल्यावर पुढें माझें बोलणेंच खुंटलें. आणि, निमुटपणें, चिमणीसारखें तोंड करून, माझी इच्छा नसतां, मला त्या दिवशीं रात्रपाळीचें जादा काम करण्यास चिंचवडास जावें लागलें !

दिवसभर दमलेलों, आणि पुनः अवघी रात्र अविश्रांतपणें काम करावयाचें व त्यांत चूक होतां उपयोगी नाहीं. नाहीं तर, मागें लिहिल्याप्रमाणें, आपल्याला संमत असलेल्या रेल्वे कंपनीच्या ठरावाबर्हुकुम आपल्यावर खटला करून घेण्यास अथवा तिचे शासनास पात्र करून घ्यावयाचें होतें ! आणि, ह्या सर्व गोष्टी समजून, होईल तितकें काळजीपूर्वक काम करण्याचें धोरण ठेवून, मी चिंचवडचे स्टेशनावर रुजू होण्यास एका मालगाडींतून जाऊन दाखल झालों. मजवर ह्या रात्रीं कोणती जबाबदारी होती ती मी समजून होतों, व मला इंद्रियवश होऊन किंवा निद्रासुखांत दंग होऊन राहतां

उपयोगी नव्हतें. ह्या वेळीं मी चिंचवडचा असि-स्टंट स्टेशनमास्तर होतों. व त्याप्रमाणेंच मजव[र] सर्व प्रकारची जबाबदारी होती. चिंचवडास जेवणखाण आटेपून स्टेशनांत जाऊन बसलों. सारी रात्र नुस्तें जाग्रण करून काम तरी काय करावयाचें? हा प्रश्न माझे मनांत आला. ह्मणून, तारायंत्राकडे बसून त्या यंत्राची साफसुफी कशी काय आहे ती पाहूं लागलों. मग मुख्य तारेपासून यंत्र सोडवून घेऊन त्याची साफसुफी करूं लागलों. परंतु तें कामही झोंपेमुळें नीट सुचनासें झालें! डोळ्यांवर झोंपेची दाट झांपड आली! मनांत तर आपल्यावर त्या दिवशींची जबाबदारी कोणती होती तिचें पुरें स्मरण होतें. तेव्हां, आपल्याला झोंप घेतां उपयोगीं नाहीं, असा मी मनाचा संकल्प करीत होतों. परंतु झोंप हुंदाडे मारून मारून माझे डोळ्यांवर आपली स्वा-री करीत होती; व मी तिला झिट्कारून हर-प्रयत्नानें दूर झुगारीत होतों! अशा रीतीनें क-सावसा मी ११ वाजेपर्यंत तारेच्या यंत्राची सफाई वगैरे करीत स्टूलावर बसलों होतों. यंत्राकडे माझे डोळे लागले होते, व ते अगदीं उघडे होते. परंतु पुढें त्यांची क्रिया बंद होऊन मी निव्यापार असा त्या स्टूलाच्या स्टुलावरच यंत्राच्या टेबलावर डोकें टेकून पडलें; तों तसाच राहिलों! हा असा तेथें मी किती वेळ होतों त्याचें मला पक्कें

स्मरण नाहीं. परंतु मनांत माझे कामाच्या जबाबदारीची धास्ती असल्यामुळें मी लवकरच खडबडून जागा झाल्यासारखा झालों व समोर घड्याळांत बघतों तों ३ वजून गेले होते! इतकी वेळ, मला भासणाऱ्या एका क्षणांत कशी निघून गेली ह्याचा मला मोठा आचंबा वाटून, माझे मनाला धडकी बसल्यासारखी झाली! मजवर जबाबदारी कोणती आणि मजकडून हलगर्जीपणा कोणता झाला, ह्याबद्दल एकदम माझे मनांत विचार उभा राहून आतां ह्याबद्दल आपल्याला कंपनीकडून काय शासन होईल, दंड होईल, किंवा फौजदारी होऊन कैदेची शिक्षा होईल, याबद्दलचेच एकसारखें चिंतन चाललें! कारण, त्या वेळीं मध्यंतरीं कोठकोठच्या तारा वगैरे येऊन गेल्या असतील, खडकीहून १ वाजतां मालाची गाडी सुटावयाची होती ती सुटून कोठपर्यंत आली असेल, इत्यादि कल्पना माझे मनांत येऊन, त्या सर्व गोष्टी जर होऊन गेल्या असतील तर मजकडून पुष्कळच हलगर्जीपणा झाला व त्याबद्दल मी पुष्कळ शासनपात्र झालों, असें मला पूर्णपणें वाटूं लागलें! डोळ्यांवरची झांपड एकदम जाऊन मी चांगला खडखडीत झालों. मीं पुनः मनांत विचार केला कीं, खडकीहून जर मालाची गाडी ठरावाप्रमाणें १ वाजतां निघावयाची तर मला खडकीहून अगोदर तार कां आली नाहीं? व मीं जरी निद्रावश झालों होतों तरी यंत्रानें घांटेचा

गजर कां केला नाहीं ? व जर केला असेल तर मी इतका गाढ निद्रावश होतों कीं काय ? ह्मणून, मी खडकीला विचारूं लागलों कीं, गाडी कोठें आहे ? परंतु ती तार मुळींच खडकीकडे न जातां, माझे यंत्रांतच सुईचा आवाज झाला ! हें असें कां व्हावें ? ह्मणून मी आश्चर्यांत पडलों. मग यंत्राचें मीं तपासलें, तों पूर्वरात्रीं यंत्राची साफसुफी करण्याकरितां याचा बाहेरच्या तारांशीं असणारा संबंध सोडवून ठेविला होता, आणि त्यामुळें त्या यंत्रांतून बाहेरच्या तारेचें दळणवळण बंद पडलें होतें, असें समजलें ! तेव्हां अर्थात्, खडकीच्या स्टेशनावरून जरी गाडी सुटल्याच्या तारा चिंचवडास आल्या असल्या तरी, त्या मला कळण्याचा मुळींच संभव नव्हता. आणि, तुमचें जें घंटेचें यंत्र तें तर मुळींच बंद पडलें होतें ! अशा माझ्या चमत्कारिक प्रकारच्या गैरसावधपणानें मी मोठ्या अपराधांत सांपडल्यासारखा झालों ! आतां पुढें नुसता विचार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें समजून, व ह्या गैरसावधपणाबद्दल जें शासन व्हावयाचें असेल तें होवो, असा मनाचा धडा करून मी पुढल्या कामास लागलों. यंत्र मुख्य तारेशीं जोडून खडकीस तार केली. तों तिकडून उत्तर आलें कीं, "तुह्मी खुशाल निजा; येथून गाडी सावकाशीरीनें जाण्याविषयीं सांगून पाठविली आहे. यावरून अर्थात् खडकीहून तारा चिंचवडास आल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय,

व त्यांस जबाब न मिळाल्यामुळें तेथून वर लिहि-ल्याप्रमाणें, "**सावधगिरीनें**" गाडी रवाना कर-ण्याचें कारण पडलें! येथें आपल्याला **सावध-गिरीनें** गाडी रवाना करणें ह्मणजे काय, हें सांगितलें पाहिजे: पुढील स्टेशनावरून तारेचा जाब मिळाला नाहीं तर स्टेशनावर कोणी नाहीं अथवा तार दुसरे जाबजबाब करण्यांत गुंतली आहे असें समजून, जी गाडी रवाना करावयाची ती **सावधगिरीनें**, ह्मणजे, अगदीं हळू हळू, पुढें एक कंदीलवाला व त्याचे हातांत एक निशाण अशा थाटानें, मिरवत मिरवत चालू होते. लाइनक्लीअर (रस्ता साफ आहे) अशी सूचना आल्याशिवाय लाइनीवरून गाडी नेणें बिनधोक नसतें; व ह्यासाठीं, वर लिहिल्याप्रमाणें गाडी **सावधगिरीनें** न्यावी लागते. येणेंकरून अर्थात् त्या गाडीला आपली पुष्कळ वेळ पुढील स्टेशन येईपर्यंत घालवावी लागते, व तेणेंकरून कंपनीचें पुष्कळ नुकसान होतें. ही **सावधगिरीनें** सुटलेली गाडी बैलांच्या खटाऱ्या गाडीपेक्षां फारशी जलद चालत नाहीं. अर्थात्, रात्रीं खडकीहून एक वाजतां सुटलेली गाडी, **सावधगिरीनें** येत असल्यामुळें, सुमारें ३॥ वाजे-पर्यंत चिंचवडास येऊन पोंचली नाहीं. तिची मी वाट बघत बसलों होतों; तों त्या बयासाहेबांची स्वारी मिरवत मिरवत ३॥ वाजल्यावर चिंचवड स्टेशनांत दाखल झाली!

मी तर गैरसावधपणानें मोठा गुन्हेगार झालों होतों. माझे जीवांत जीव नव्हता! आतां दुसरे दिवशीं आपल्याला कंपनीकडून काय शासन होईल अथवा आपल्यावर फौजदारी होऊन तुरुंगवास भोगण्याची पाळी येते, काय होतें कोण जाणे, अशा विवंचनेंत मी होतों! एकदां वाटे, आतां त्याबद्दलची विवंचना आणि काळजी ती कशाला पाहिजे? झाली गोष्ट ती होऊन गेली. आतां त्याबद्दल काय परिणाम होणें असेल तो होईल. असें मनाचें कांहीं सांत्वन करीत होतों व कांहीं विवंचनेंत पडून गोंधळल्यासारखा झालों होतों. तों, वर लिहिल्या-प्रमाणें, गाडी स्टेशनांत आली. गाडीवरचे ड्राय्-व्हर व गार्ड हेही माझेसारखेच रेल्वे कंपनीचे नौकर असून, मजकडून ज्या चुका घडण्याचा संभव तशाच प्रकारच्या चुका त्यांजकडूनही घडण्याचा संभव होता. असें असतां, व त्यामुळें एका खात्यांतील नौकरांनीं एकमेकांविषयीं अभिमान बाळगून एकमेकांस संभाळून घ्यावें हा जो मनुष्याचा जतिबांधवाभिमान, त्यापासून कित्येक नीच बुद्धीचे लोक अगदीं दूर असतात. ह्याचा अनुभव अने-कांस अनेक प्रसंगीं येत आहेच. त्याच प्रकारच्या नीचपणाचा अनुभव मला ह्या वेळीं आला. गाडी स्टेशनांत आल्यावर मला त्या गाडीवरचा गार्ड आणि ड्राय्व्हर येऊन भेटले. मजकडून जी चूक झाली होती तिच्याबद्दल मला कंपनीकडन जें शासन

व्हावयाचें तें तर होणार होतेंच. परंतु अशा वेळीं, त्यांणीं मजकडे येऊन माझें समाधान करावयाचें कीं, झाली ही चूक फारशी धोक्याची झाली असें तुम्ही समजूं नका; अशा चुका सर्वांकडूनच होतात त्याबद्दल फारशी भीति किंवा काळजी करणें नको; वगैरे बोलून माझे चिंतातुर मनाला कांहीं तरी समाधान वाटेल असें त्यांणीं बोलावयास पाहिजे होतें. परंतु तसें कांहीं एक न बोलतां, उलट, त्यांणीं, मला जास्त भीति वाटावी आणि मी जास्त चिंतामग्न व्हावें ह्मणून, असें कांहीं भाषण केलें कीं, तेणेंकरून मी जास्त फिकीर न बाळगतां त्यांस एकदम सांगितलें कीं, "तुह्मी नीच लोक आहांत; अशा वेळीं माझी चिंता दूर होण्यासारखें कांहीं माझें समाधान करायचें तों तुह्मी माझे भीतीमध्यें व विवंचनेंत आणखी आणखी भर टाकतां; तेव्हां तुह्मी अधम आहांत व तुमच्याशीं बोलण्याचा प्रसंग होईल तितका टाळण्याचा मनुष्यानें प्रयत्न करावा; व त्याप्रमाणें मी तुमच्याशीं ह्या बाबतींत बिलकुल बोलूं इच्छीत नाहीं. तुह्माला ह्या कामांत कांहीं एक बोलण्याचें कारण नाहीं. माझे चुकीबद्दल कंपनी चौकशी करील व मला जें काय शासन करावयाचें तें ती करील. त्याबद्दल मी तुह्मांस विचारीत नाहीं आणि तुमच्या अमल्या भेवडावण्याला मी भिणाराही नाहीं." असें जेव्हां मीं त्यांना अत्यंत बेपर्वाईनें

सांगितलें तेव्हां ते पुढें जास्त कांहीं एक न बोलतां, मी पुढील स्टेशनावरची " लाइनक्लियरची " बात-मी त्यांस दिली, आणि ते पुढें गाडी हाकून चाल-ते झाले.

पुढें मग मला त्या रात्रीं झोंप ह्मणून आली नाहीं. मला ही भीति होतीच कीं, ट्र्याफिक सुप-रिंटेंडेंट येऊन आतां आपल्या चुकीबद्दल आपल्यावर खटला करणार ! त्याबद्दलची मला इतकी भीति वाटूं लागली कीं, माझकडे कोणी काळ्या पोषाखाचा मनुष्य येतांना मीं बघितला कीं, मला बोलावण्या-करितां पोलिसचा शिपाईच आला आहे असें वाटून माझें पोटांत धस्स व्हावें ! असें होतां होतां दुसरे दि-वशीं ट्र्याफिक इन्स्पेक्टर यांची स्वारी आली व त्यांणीं रीतीप्रमाणें मला बोलावून नेऊन कशी काय चूक झाली ती विचारून घेतली. त्या बिचाऱ्यानें, मला वरिष्ठाच्या नात्यानें जरा दरडावून वगैरे बो-लावयाचें, पण तसें न करितां सौम्यतेनें माझा जाब घेऊन मुंबईस पाठविला. याउढें तिकडून काय हुकू-म होतो त्यावर ह्या चौकशीचें अवलंबन होतें. पुढें कांहीं दिवसांनीं हुकूम आला कीं, तुह्मांला चिंचवड-च्या अमूक तारखेच्या चुकीबद्दल १० रुपये दंड केला आहे. हा दंड अर्थात् मला निमुटपणें सहन करावा लागला. उलट मी त्यामध्यें दुःखात समाधा-न असें मानिलें कीं, जीवावर आलें होतें तें शेपटी-वरच गेलें ! व मी ही एक प्रकारें कंपनीची मजवर

मेहेरबानीच समजलों. कंपनीनें जर मजवर फौजदारी करून, मला तिचे कायद्याप्रमाणें कैदेची किंवा जास्त दंडाची शिक्षा दिली असती तर काय करावयाचें होतें ? मजकडून चूक तर झाली होतीच. तेव्हां मला कांहीं जरी कंपनीनें शासन केलें असतें तरी तें मला निमूटपणें सोसणें प्राप्तच होतें ; आणि त्याकरितां मला झालेला १० रुपये दंड थोडाच झाला असें समजून, मी स्वस्थ बसलों. रेल्वे खात्यांत नोकरांना दंड होण्यामध्यें कांहीं कमीपणा अथवा गैर अब्रु समजली जात नाहीं. "नित्य मरे त्याला कोण रडे ?" महिन्यांतून एखादे वेळीं तरी दंड झाल्य वांचून महिना पार पडणें मोठें भाग्य समजलें जातें ! सर्व रेल्वे कंपन्याकडे कोणाला कधींही कांहींएक दंड झाला नाहीं असा शपथेला देखील एकही नौकर मिळावयाचा नाहीं, अशी माझी समजूत आहे. सर्वच नौकर जेथें दंषी व अपराधी सांपडावयाचे तेथें मग दंड झाला तर त्याबद्दल कोणीं कोणाचा कमीपणा समजावा व कोणीं कोणाची गैरअब्रू झाली ह्मणून मानावें ? सर्वचजण जर एकाच जुवाखालीं आपल्या माना अडकवुन हमाली करण्यास लागले असतात तर, कोणाच्याही पाठीवर असुडाचा रट्टा बसला तर त्याबद्दल एकमेकांचा कमीपणा समजण्यांत काय अर्थ आहे ?

अशा प्रकारें पत्र्याचीं जादा कामें ठिकाठि-

कार्णीं जाऊन, रात्र किंवा दिवस यांचेकडे न ब
तां, मीं सुमारें ३॥ वर्षें केलीं. इतक्या मुदती
ध्यें माझा शक्तिपात मात्र फार झाला! माझें पहि
अवसान, पहिला दम आणि पहिली कर
हीं पुष्कळ अंशांनीं शिथिल पडलीं. व ह्याचा मा
मलाच अनुभव येऊं लागला! मी सतत जाग्रण
अगदीं फिकट पडून पांढऱ्या पालीसारखा झाल
माझी अशी अवस्था होणें चांगलें नव्हे असें म
मलाच वटूं लागलें! पुढें मग मी कंपनीकडे माझ
कामकाजांची सर्व हकीकत लिहून खुलासेवार
अर्ज केला व त्या अर्जांत अशी विनंति केली
मी आजपर्यंत ठिकठिकाणीं ३।४ वर्षें फिरून व
त्रीं बेरात्रीं कामें करकरून दमल्यासारखा झालों
हें; तर मला आतां कोठें तरी बढती देऊन निय
जागीं नेमणूक मिळावी. आजपर्यंत मी जीं
कामें केलीं त्यांतीळ हुशारीबद्दल कंपनीच्या अ
कार्यांचीही खात्री झाली होती. तेव्हां, कंपनी
व्यवस्थापकांकडून माझी नेमणूक तळेगांव स्टेशन
असिस्टंट स्टेशन मास्तरचे हुद्यावर झाली. म
रात्रीचे कामाचा अगदीं वीट आला होता; आ
माझ्या अशक्ततेचें मुख्य कारण ह्मटलें तर म
रात्रीं जें काम करावें लागत असे तेंच होय. ह
साठीं मी ही जागा नाकारली. परंतु, त्या वेळ
दुसरी कोठें बढतीची जागा देण्यासारखी शिल
नसल्यामुळें, कंपनीनें, तूर्त हीच जागा पत्करल्या



शिवाय बढतीची दुसरी जागा नाहीं, असें मला कळविलें; व मग नाइलाजानें मीं तळेगांवच्या अ-सिस्टंट स्टेशनमास्तरचीच जागा पत्करली.

मला ३९ रुपये पगार झाला. असिस्टंट स्टेशनमस्तरचें काम ह्मटलें ह्मणजे रात्रींचेच असतें हें सांगायला नकोच. मला यद्यपि रात्रीच्या कामाचा वीट आला होता तरी, आतां एका ठिकाणीं कायमचा होऊन ज्यास्त पगार झाल्यामुळें त्यांतच सुख मानून तळेगांव स्टेशनावर मी रात्रीचा दिवस करून राहिलों.

ह्या नौकरीरूप गुलामगिरीचा स्वीकार केल्यापासून मला निशाचरवृत्ति बरीच पत्करावी लागली; आणि त्या वृत्तीचे अवलंबनांत तदनुषंगीय जीं कांहीं दिनचर्येच्या संबंधानें मला अल्पस्वल्प पातकें करावीं लागलीं तीं मीं नाइलाजानें केलीं! ह्यापेक्षां मला जास्त कांहीं सांगतां येत नाहीं. आमच्या धर्मशास्त्रानें ज्या गोष्टी दिवसां करण्याविषयीं निषिद्ध ह्मणून ठरविल्या आहेत त्या गोष्टी आह्माला निशाचरवृत्ति स्वीकारून नाइलाजानें दिवसां कराव्या लागल्यास त्यांत आमचा तरी काय दोष आहे? ह्या जागेपासून मला कोणत्याही प्रकारचें सुख तर झालें नाहींच; परंतु उलट मोठा ताप झाला. मी तळेगांवीं असिस्टंट स्टेशनमास्तर झालों; परंतु त्या हुद्यांत आनंद किंवा गौरव मानण्यासारखें काय होतें? मला रात्रीं सर्वच कामें करावीं लागत;

आणि त्या कामांखालीं मला रात्रची रात्र केवळ उभ्यानें आणि आलोचन जागर करून काढावी लागे। ह्या हुद्यावर मी असतां तेथें रात्रीं मीच तारमास्तर, मीच टिकिटमास्तर, मीच लगेज-व-पार्सलक्लार्क, मीच टिकिट कलेक्टर आणि मीच शटिंग मास्तर असें. माझे हाताखालीं एकही मनुष्य माझे मदतीला किंवा विसांव्याला नव्हता. आणि, इतकींही कामें बिनचोमाट व चोख करण्याविषयी मला सावधगिरी ठेवावी लागे, हें आतां पुनः पुनः सांगण्याचें कारण नाहींच. माझे अंगांत विशेष चपळाई असून मला स्वाभाविक अशीं अनेक कामें करण्याची हौस असल्यामुळें, तीं मीं पहिल्यापहिल्यानें तर हुशारीनें केलीं; परंतु पुढें माझा जीव त्या नौकरीस व हुद्यास अगदीं कंटाळून गेला, व त्या अतिशय दगदगीनें किंवा मेहनतीनें मला दोन वेळां भयंकर मधुऱ्याचीं दुखणीं आलीं! त्या दुखण्यांतून माझें केवळ पुनर्जन्मच झालें! मीं माझे वरिष्ठ अधिकारी जे मुख्य स्टेशनमास्तर त्यांजकडे या भोगाव्या लागणाऱ्या यातायातींच्या संबंधानें एक दोन वेळां गोष्ट काढली. परंतु त्यांणीं मला असें उत्तर दिलें कीं, आजपर्यंत तुमच्या अगोदरचे लोक जर हींच कामें बिनतक्रार करीत आले आहेत, तर तुमचेंच म्हणणें कंपनी तरी कसें मनावर घेईल ? आणि मी तरी कोणत्या आधारानें यासंबंधानें वरिष्ठांकडे तुमचें म्हणणें कळवूं ! असें

स्टेशनमास्तराचें भाषण ऐकून अर्थात् मी निरुत्तर झालों. आणि नाइलाज ह्मणून आपलें काम तसेंच नेटानें एकटाच करीत होतों.

एके वेळीं असें झालें कीं, तळेगांवच्या स्टेशनावर सामानाची गाडी आली असतां सांधेवाल्याकडून सांधा दाबण्याचें धोरण चुकून, एक दोन गाड्या रूळावरून खालीं आल्या; व त्यामुळें तेथें अपघात होण्याचा संभव होता. त्या गाड्या रूळावर चढविण्याच्या व्यवस्थेकडे व त्याचप्रमाणें त्या स्टेशनावर पुढच्या गाडींतून उतरणारे किंवा चढणारे उतारूंच्या व्यवस्थेकडे मी पूर्णपणें लागलों होतों. याच दिवशीं आमच्या स्टेशनावरचें तारेकडील घंटेचें यंत्र बिघडून गतिशून्य झालें होतें; ह्मणून दुसऱ्या सुईच्या यंत्रावर तारेचें काम मी करीत होतों. आणि इतर ओझीं चढविण्या उतरण्याच्या कामाचेंही मलाच धोरण ठेवावयाचें होतें. याप्रमाणें, मी ह्या रात्रीं वरील एक दोन विशेष कारणांनीं विशेष हुशारी दाखवून चिनचोपाट कामें करण्यांत अगदीं गुंतून गेलों होतों, व तीं सर्व कामें यथास्थितपणें व निदान माझे मनास संतोष वाटण्यासारखीं मी केलीं. वास्तविक रीतीनें कामांच्या धोरणाची खरी परीक्षा म्हटली तर अशाच आणीबाणीच्या वेळीं होत असते. मी ह्या वेळीं जी हुशारी आणि जें चापल्य उपयोगास लाविलें तें जर कोणा सुजाण अधिकाऱ्यानें बघितलें असतें तर त्यानें खचित माझ-

बद्दल कंपनीकडे योग्य शिफारस केली असती. अथवा, हा सर्व प्रसंग कोणा गुणग्राहकानें चवितल असता तर त्यानें खरोखर माझी पाठ थोपटून मल जास्त उत्तेजन दिलें असतें. परंतु तशा प्रका माझी मेहनत व माझें खरें कर्तृत्व जाणणारा ते कोणीच नव्हता ! इतकेंच नव्हे; तर, मी जो आप ल्याशींच संतोष व समाधान मानून, आपण रेल्वे कंपनीचें काम फार सावधगिरीनें व चोखपणें करितो म्हणून मनामध्यें एक प्रकारची कृतकृत्यता समजत होतों, तो माझा संतोष, तें माझें समाधान, आणि ती माझी मानलेली कृतकृत्यता पुढच्या अनुभवानें सर्व व्यर्थ होऊन, माझी पूर्णपणें निराशा होण्यासारखा अत्यंत खेदकारक प्रकार कंपनीकडून घडून आला ! वर सांगितलेल्या रात्रीच्या माझे हुशारीच्या, उत्कृष्ट धोरणाच्या आणि खऱ्या चपळ ईच्या गुणाबद्दल मला शाबासकी व बहाली बढती लिहून येण्याचे ऐवजीं ट्रॅफिक सुपरिंटेन्डेंटकडून ३ रुपये दंड केल्याबद्दल लिहून आलें ! कां कसा आहे न्याय ? हा दंड कशाबद्दल झाला हेंही येथें सांगितलें पाहिजे.

वरील रात्रीं माझें स्टेशनावरील तारेचें यंत्र बिघडलें होतें हें मीं वर कळविलेंच आहे. हें यंत्र बिघडलें तें तरी माझे हातानें बिघडलें नसून, रेल्वेच्या तारायंत्रखात्याकडील इन्स्पेक्टराकडून जो मेंटेनन्स ओव्हरसीअर तारायंत्रांच्या दुरुस्त्या व पाहण्या



करण्याकरितां फिरत असतो त्याचेकडूनच बिघडलें होतें. त्याबद्दलचा दोष मजकडे नव्हता. त्याच रात्रीं वरील ओव्हरसीअर माझे स्टेशनावर तारायंत्र बघण्यास आला होता व त्याची दुरुस्ती व पाहणी फार दिवसांत झाली नव्हती म्हणून मीं त्याला कळविलें कीं, फुरसत असल्यास आमच्या यंत्राची एकवार तपासणी करून जा. व त्याप्रमाणें तो, तें त्याचें कामच म्हणून यंत्राची दुरुस्ती वगैरे करीत बसला, व तो तें आपलें दुरुस्तीचें काम करीत असतांच तें यंत्र गतिशून्य झालें! तास दोन तासांत जें काम व्हावयाचें तें काम, त्या यंत्राच्या बिघडण्यानें त्या ओव्हरसिअरास ती सारी रात्र करीत बसावें लागलें. ज्या अर्थीं तें यंत्र ओव्हरसिअराचे हातानेंच बिघडलें होतें त्या अर्थीं, तें त्याचेकडूनच नीट व्हावयाचें होतें. त्याला दुसऱ्या कोणाची मदत पाहिजे होती असें नाहीं. व पाहिजे असती तर ती त्याणें मला ताबडतोब कळवून पुण्यहून मागविली असती. परंतु, तसें कांहीं ओव्हरसिअराकडून मला कळविण्यांत आलें नाहीं. असें होतें तथापि, मी पुण्यास मेंटेनन्स टेलिग्राफ इन्स्पेक्टर यांस कळविलें कीं, मुख्य तारायंत्र दुरुस्ती करितांना बिघडलें आहे व ओव्हरसिअर तें नीट करीत बसले आहेत. इतका त्या बिघडलेल्या तारायंत्राच्या संबंधानें मीं माझे मुखत्यारीनें व्यवहार केला असतांही, मजवर पुण्यास

असलेल्या परम दयाळू आणि सुशील ट्रॅफिक टेलिग्राफ इन्स्पेक्टर साहेबांनीं निष्कारण आग पाखडून, "तुह्मीं तारायंत्र बिघडल्याबद्दल आह्मांकडे लवकर कळविलें नाहीं ह्मणून तुह्माला ३ रुपये दंड केला आहे," असा ट्रॅफिक सुपरिंटेन्डेन्टकडून हुकूम कळविला! हा निवालस अन्यायानें झालेला दंड पाहून मला काय वाटलें असेल ह्याची कल्पना कोणालाही सहज करतां येईल! मीं पुनः माझें ह्मणणें, व त्या रात्रीं मीं कोणत्या बिकट स्थितींत असून, माझ्या समजुतीप्रमाणें मीं कसकसें धोरण, हुषारी आणि चपलता वापरली, आणि ज्या दोषाबद्दल मला दंड करण्यांत आला तो दोष किती निष्कारण होता, ह्याबद्दल खुलासेवार पत्रद्वारें कळविलें. परंतु त्या कळविण्याचा कांहीं एक उपयोग न होतां, ज्या रात्रीच्या आणीबाणीचे वेळीं मीं विशेष श्रम केल्याबद्दलचें मला माझे आयुष्यांत पूर्ण स्मरण राहून त्याविषयीं मीं आपली धन्यता मानतों, त्याच रात्रीबद्दल, मला ३ रुपये दंड न्यायी कंपनीच्या जाणत्या अधिकाऱ्यांकडून झाला! ह्यापेक्षां तें जास्त कोणतें पारितोषिक मीं माझे अन्नदात्या रेल्वेकंपनीकडून इच्छावयाचें होतें?

अशा एकच नव्हे, तर अनेक कारणांनीं, रेल्वे कंपनीच्या नोकरांस प्रति दिवशीं अपमान, निरुत्साह आणि निराशा ह्यांचे दुःख निमूटपणें [illegible] होऊन सोसण्याचें भाग पडतें. त्याबद्दल कोठेंच दाद आणि

१८३२९

किर्यादु चालावयाची नाहीं. कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मतानें जो ग्रह होईल तो कायमचा; आणि त्या त्यांच्या दुराग्रहामुळें आमच्यासारख्या श्रमपोसक आणि अस्थवाईक नौकर लोकास जे काहीं दंडखंड, आरोप, दोष, आणि ठपके सोसणें कपाळीं येईल ते सर्व निमूटपणें सोसल्याशिवाय गत्यंतरच नसतें. तेव्हां आतां ह्या अशा चाकरीला सन्मानदायक नौकरी ह्मणावी किंवा पोट जाळण्याकरितां गुलामगिरी ह्मणावी ! रेल्वेकडील नौकरास असा एकाच प्रकारें त्रास व जांच सोसावा लागतो असें नाहीं. दुर्दैवानें तो आजारी पडला ह्मणजे त्याच्या दैनांना तर पारावार नाहींसा होतो! रेल्वेकडे, वर्षांत सवड झाल्यास १० दिवस हक्काची, एक महिना अर्धा पगारी आजारीपणाची, आणि पुढें बिनपगारी, अशी रजा देण्याचा ठराव आहे; हें मी वर एके ठिकाणीं सांगितलें आहेच. ज्याचे नौकरीवर त्याच्या घरचें सर्व कुटुंब अवलंबून असतें तो जर दुर्दैवानें आजारी पडला व तो त्याचा आजार एक महिन्यावर गेला तर, त्याची कुटुंबांतील मंडळी उपाशींच मरण्याचा प्रसंग यावयाचा हें उघड आहे ! बरें, हा नौकर खराच आजारी आहे असें रेल्वेकडील डाक्टरानें सर्टिफिकेट दिलें तरच त्या आजारी मनुष्यास आजारीपणाचा पहिला महिना अर्धा पगार मिळतो; व पुढें पुनः सर्टिफिकेट मिळविण्याकरितां डाक्टराकडे जाऊन त्याची मनध-

रणी करावी लागते. डा० साहेबांची लहर लागली तर ते आजारीपणाचें सर्टिफिकेट देतात; नाहीं तर देत नाहींत. मग त्य बापड्याचे प्राण अगदीं कंठाशीं आले तरी त्याची ते पर्वा करीत नाहींत! सर्टिफिकेट देण्याविषयीं अशी घांसघीस करण्याबद्दल रेल्वेच्या अधिकाऱ्यांची आंतून कांहीं सांगी आहे कीं काय न कळे! वर मीं जें कळविलें कीं, तळेगांवीं मी जीवापाड मेहनतीची असि० स्टेशनमस्तरची नौकरी करीत असतां दोन वेळां मधुऱ्याच्या दुखण्यानें मीं आजारी पडलों, त्या वेळीं तर, मला डा० कडे जाऊन त्यांची थुंकी कशी झेलावी लागते ह्याचा अनुभव पूर्णपणें आला! सारांश, चोहोंकडून एकसारखें तापत्रय बिचाऱ्या रेल्वेकडील नौकरांना भोगावें लागतें! देवानें मनुष्यांना दुसऱ्या शेंकडों प्रकारच्या आपत्ति द्याव्या; परंतु रेल्वेकडे नौकरी पतकरण्याचा प्रसंग कधींही कोणास देऊं नये, असें मला प्रति पावलीं वटूं लागलें! याचें कारण हेंच कीं, ह्या खात्यांत मनुष्याची पारख आणि त्याच्या गुणांचे मोल हीं कोणासच करितां येत नाहींत. जो तो अरराव! आपल्या दिमाखांत आणि डौलांतच राहायचा! ह्या खात्यांत शिरलें कीं, मनुष्याचें मनुष्यपण जातें! रेल्वेकडील कांहीं टिकिटमास्तर, तिकिट कलेक्टर, गुड्स क्लार्क, सिग्नलर वगैरे कित्येक मंडळी फार उद्धट व मगरूर अशी कित्येक ठिकाणीं आढळते. याचें कारण रेल्वे कंपनीच्या

अन्नाचाच हा असा गुण होतो कीं काय न कळे! ह्या सर्व गोष्टी जाणून, मी माझी शांतता, माझें मनुष्यपण आणि माझो माझ्या इतर सुशील देशबांधवांशीं एकता ही राखण्याकडे नेहमीं लक्ष्य देऊन, त्याप्रमाणें कोणत्याही अधिकाराचें व हुद्याचें काम करीत असलों तरी वागत असें; व ह्याबद्दलचा अनुभव ज्यांना ह्मणून मजशीं यत्किंचित् कामांत भेटण्याचा व बोलण्याचा प्रसंग आला आहे त्यांस कळून चुकला आहे. परंतु माझ्या ह्या गुणांना रेल्वेखात्यांत किंमत कोठें होती?

तळेगांवच्या असि० स्टेशनमास्तरचे हुद्यावर मीं दोन वर्षें काढलीं; परंतु एवढ्या मुदतींत मीं अगदीं त्रासून गेलों. रात्रीची नौकरी ह्यापुढें न करितां, दिवसाचे कामावर कंपनीनें कोठें नेमणूक केली तर बरें आहे; नाहीं तर आपली पूर्वींचीच तारमास्तराची नौकरी मागून घेऊन, हा मागें लागलेला व्याप आणि अनेक प्रकारच्या जोखमी दूर कराव्या, असा विचार मीं केला. व एके दिवशीं संधि साधून ट्र्याफिक सुपरिंटेंडेंटास प्रत्यक्ष तोंडीं विनंति केली. ह्या विनंतींत मीं त्या अधिकाऱ्याला, मीं आजपर्यंत कसकशीं संकटें सोसलीं व रात्रींच्या निरंतरचे जाग्रणानें माझी प्रकृति कशी क्षीण होत चालली होती तें सर्व खुलासेवार कळविलें. तेव्हां, त्यांना देवानें काय सुबुद्धि दिली त्याप्रमाणें त्याणीं मला विचारलें कीं, पुण्यास असलेला प्यासेंजर्स गाईड नु-

कान बारला आहे, त्या जागेवर तुझी जात असलां तर मी तशी तजवीज करतों. सुपरिंटेंडेंटनें हें ह्मणणें लागलेंच मीं कबूल केलें; व थोडेच दिवसांनीं माझी पुण्याचे प्यासेंजर गाईडच्या हुद्यावर नेमणूक झाली.

तळेगांवच्या स्टेशनावर मीं फार श्रम सोसले, गैरसोयी सहन केल्या, आणि त्यामुळें जिवाला फार ताप झाला. आतां तळेगांव सोडतां सोडतां मला माझे एका मित्राचे संबंधाचाही येथें खुलासा केल्याशिवाय राहवत नाहीं. तळेगांव स्टेशनावर एक तारमास्तर, गुलाम हुसेन लतीफ ह्या नांवाचा, तरुण मुसलमान होता. हा धर्म व जाती ह्यांणीं मात्र भिन्न होता; परंतु त्याचें मजशीं माझ्या तेथील एकंदर राहण्यामध्यें केवळ सख्ख्या बंधूप्रमाणें वर्तन होतें. मुसलमान जातीमध्यें अशा प्रकारचा सुशील, समंजस आणि ममताळु मनुष्य, मला वाटतें, क्वचित् आढळेल. तो माझा तळेगांव येथें परम मित्र आणि हितचिंतक होता. त्याच्या सहवासानें मला फार सुख झालें व त्याच्या गोड स्वभावानें माझे श्रांत व त्रस्त चित्तास पुष्कळ समाधान होत असे. थोडक्यांत सांगतों कीं, गुलाम हुसेन लतीफ याच्या सुस्वभावाशीं मुसलमान जातीच्या तरुण मंडळींत बरोबरी करणारा सांपडणें अशक्य आहे. एवढ्यावरूनच त्याच्या गुणांची किंमत समजावी. तळेगांव सोडताना तेथील सर्व मंडळीला वाईट वाटलेंच;

परंतु ह्या गुलाम हुपेनाला व त्याचेकरितां मला अतिशयच दुःख झालें! तथापि, सर्व मंडळीनें, मी दुःखांतून सुखांत जात आहें असें समजून आपलें समाधान केलें व मला त्यांणीं निरोप दिला. मनुष्यानें आपल्या सहवासांतल्या लोकांस प्रिय होणें किंवा अप्रिय होणें हें त्याच्या स्वतःच्या वर्तनावर अवलंबून आहे व याचा अनुभव मला आजपर्यंत अनेक वेळां आला आहे. मीं जेथें जेथें नौकरी केली तेथून तेथून जाते वेळीं मजबद्दल कोणालाही वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. हें सांगणें ह्मणजे आत्मश्लाघा करण्याच्या दोषास आपल्याला पात्र करून घेण्यासारखें होईल, हें मी समजून आहें. परंतु, माझे नौकरीच्या संबंधाचे एकंदर आविष्करणांत ह्या ज्या खऱ्या गोष्टी घडल्या त्यांचा थोडासा तरी उल्लेख केल्यास माझे देशबांधव मजवर, वर ह्मटलेला आत्मश्लाघेचा दोष देणार नाहींत अशी मला खात्री आहे.

पुण्यास प्यासेंजर्स गाईड याणें स्टेशनावरच राहावें असा रेल्वे कंपनीचा ठराव आहे; व त्याप्रमाणें स्टेशनच्या पलीकडच्या बाजूस सुमारें २० फूट औरसचौरस एक कोठडी बांधून ठेविली आहे तेथें माझे राहण्याची कंपनीनें व्यवस्था केली. ही जागा रस्त्यापेक्षां खोल जागेंत असल्यामुळें पावसाचें पाणी त्या कोठडींत मुरून तिला यथेच्छ ओल आली होती. अशा जागेंत कांहीं दिवस मीं कसाबसा नेटानें राहिलों. परंतु माझ्या त्या नेटाचें

फल मला लवकरच अनुभवास येऊं लागलें! ह्या कोठडीनें माझ्या राहण्यास सर्व प्रकारची गैरसोय झाली. ब्राह्मणाच्या संसारास ह्या जागेपेक्षां कांहीं तरी जास्त व प्रशस्त अशी जागा असणें अवश्य होतें. पाण्याची तर फारच गैरसोय होती. माझी कोठडी पलीकडच्या बाजूस आणि पाण्याचा नळ आलीकडच्या बाजूस. तें पाणी आणावयास रेल्वे लाइन ओलांडून जाण्याशिवाय दुसरा रस्ता नाहीं. आणि लाइनीवर गाड्या फिरत नाहींत अशी दिवसाची कोणतीही वेळ नसावयाची. ह्याप्रमाणें, आलीकडून कोठडींत पाणी नेणें मोठ्या धोक्याचें होतें; आणि ह्यामुळें घरांत बायकामनुष्यांना तर पाणी आणण्यास पाठविण्याची बिलकुलच सोय नव्हती. शेवटीं मला पैसे खर्चून पाणी पुरविण्यासाठीं एका पाणक्याची योजना करावी लागली!

कोठडींतल्या सर्द हवेनें घरांत मुलांमाणसांच्या प्रकृति बिघडूं लागल्या. तिन्ही ऋतूंत ह्या कोठडीमध्यें सुख म्हणून नव्हतें: पावसाळ्यांत, केवळ चिखलामध्यें राहणें प्राप्त होई; हिंवाळ्यांत, कोठडी अगदीं उघड्या मैदानांत व शेजारीं इतर घरांचा वगैरे आडोसा नसल्यामुळें, अतिशय थंडी सोसावी लागे; आणि उन्हाळ्यांत, कोठडीवरील व बाजूचे लोखंडी पत्रे अगदीं तापून केवळ पंचाग्निसाधनांत सहकुटुंब राहिल्यासारखें होऊन अतिशय ताप सहन करावा लागे! इतकेंच होऊनही रहात

नसे. ही कोठडी अगदीं उघड्यावर असल्यामुळें रात्रीं बेरात्रीं चोराचिलटांचें भय फार बाळगावें लागे. कारण, ह्या कोठडींत मी राहूं लागल्यापासून माझ्या बऱ्याच लहान मोठ्या जिनसा चोरीस गेल्या व त्यांविषयीं रेल्वे पोलिसास मी वेळोवेळीं वर्दी देत गेलों असतांही त्यांचा पोलिसाकडून तपास न लागतां मीं तें नुकसान निमूटपणें सोसून राहणें भागच झालें !

ही सर्व हकीकत मी, मि. ट्र्याफिक सुपरिं. व स्टेशनमास्तर मि. बेकर यांस कळविली व ह्या तापत्रयांतून माझी सोडवणुक करून दुसरीकडे मला माझे सोयीस पडेल तेथें राहण्याची परवानगी देऊन भाड्याची मंजुरी देण्याविषयीं त्यांस विनंति केली. एके वेळीं तर वरील दोघांही अधिकाऱ्यांस मीं माझी कोठडी प्रत्यक्ष नेऊन दाखविली. आणि त्यांत त्यांस असें खास वाटलें कीं, ही जागा मानवी जातीच्या सकुटुंब प्राण्यास राहण्याला अयोग्य आहे. परंतु, नेटिव नोकरांच्या जीवांची इतकी पर्वा ठेवणें हें गोऱ्या कातडीच्या सद्धर्मवर्ती ख्रिस्ती अधिकाऱ्यांस अगदीं अयोग्य आहे असें मनात येऊनच कीं काय, त्या दयाभूत ट्र्याफिक सुपरिं. साहेबांनीं, चकचकित मला असें कळविलें कीं, " ही ज्या अर्थीं ओली व दमट जागा आहे त्या अर्थीं ती राहण्याला अयोग्य तर खरीच; परंतु ही ओल आणि हा दमटपणा तुह्मीं मुद्दाम पाणी ओतून आह्माला खरा

मला ठेविण्याकरितां आणिला आहे! तुह्माला येथेंच राहिलें पाहिजे व दुसरीकडे राहण्यास आमच्यानें माझ्याची मंजुरी देववत नाहीं. आणि तुह्मीही, येथून दुसरीकडे कोठें राहण्यास जातां उपयोगी नाहीं." असें जेव्हां झालें तेव्हां तर हालवून खुंटा बळकट केल्याप्रमाणें, मीं आपलें राहणें तेथें अगदींच कायम करून घेतल्यासारखें केलें! कांहींच उपाय राहिला नाहीं. तथापि, ट्रॅफिक सुपरि. यांणीं माझे कोठडींतील जमीन खणवून, वरवर मुरूम वगैरे टाकवून नवीन जमीन करण्याची परवानगी दिली व मींही आणखीं आपल्या पदरचे पैसे खर्चून, माझे कोठडीभोंवतीं तट्टये वगैरे लावून जरा जास्त सोय करून घेतली. तथापि, ही सोय पावसाळ्यावांचून इतर ऋतूंत मात्र बरी असे. शेवटीं, मीं तेथें राहण्यास फारच त्रासलों. तेव्हां, प्यासेंजर सुपरिंटेंडंट मि. कायली यांना मीं माझे कोठडीची सर्व स्थिति कळविली व प्रत्यक्ष ती त्यांस दाखविलीही. तेव्हां त्यांणीं कृपा करून मला मोतीचौकांतील टिकिट विक्रीच्या आफिसाचे घरांत राहण्याची परवानगी दिली. परंतु तेथें जाऊन बघतों तों तें घर ह्मणजे काय केवळ निमित्तावरच टेंकलेलें होतें. त्याची सर्वांशांनीं नादुरुस्ती असून तें अगदीं पडायाला झालें होतें. तेव्हां, अशा घरांत राहणें बिनधोक नाहीं असें वाटून, पुनः आतां आपण रहावें कोठें अशी मला पंचाईत पडली. तथापि, पडत्या फळाची आज्ञा समजून,

ज्या अर्थी शहरांत राहण्याची परवानगी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळाली होती त्या अर्थी ती जवळ ठेवून, वायां न दवडतां, शहरांतच पदरच्या भाड्यानें जागा घेऊन तेथें मी सुखानें व निर्भयपणें सकुटुंब राहूं लागलों.

पहिले स्टेशनमास्तर मि. बेकर हे फारच सात्विक आणि उमद्या स्वभावाचे गृहस्थ होते. त्यांणीं आपल्या कारकीर्दींत मला कोणत्याही प्रकारें दुःख किंवा त्रास होईल अशा रीतीनें वागविलें नाहीं. व त्यांची कारकीर्द मला फारच सुखाची वाटली. प्यासेंजर गाईडचें काम केलें तर परोपकार करण्याला अत्यंत योग्य आहे. नाहींतर राजासारखें अगदीं रिकामटेंकडें व आळशाप्रमाणें हातपाय ताणून बसण्यासही तें फार उत्तम आहे. त्या जाग्यावर जसा मनुष्य असेल त्याप्रमाणें त्याला दोन्ही प्रकारें आपली वर्तणूक ठेवण्याच्या सोयीचें तें काम आहे. माझा स्वभाव आळशासारखें बसण्यांतच सुख आहे असें मानून राहण्याचा नसल्यामुळें, स्टेशनावर येणाऱ्या उतारू लोकांची आपल्या हातानें जितकी सोय आणि व्यवस्था करवेल तितकी करून देण्यास मीं कधींच आळस केला नाहीं. उतारूंमध्यें अनेक प्रकारचे लोक येतातः ह्यात रेकोतारे, मुलांबाळांचे धनी, आजारी, व्यथित, त्या सर्वांच्या यथायोग्य व्यवस्था व सोयी माझ्यानें होतील तितक्या करून देण्यास मीं कधींही हयगय केली नाहीं.

म्हातारीं मनुष्यें ओझ्यानें वांकलीं असून मोठ्या कष्टानें व लगबगीनें गाडीकडे येत असतां त्यांचें ओझें आपल्या खांद्यावर घेऊन व त्यांना नीट हातीं धरून एखाद्या प्रशस्त जागीं त्यांचे बसण्याची सोय करून देऊन त्यांचे तोंडून आशीर्वाद घेण्याची मला अतिशय उत्कंठा असे. माझे कामावर मी असतां उतारूंशीं जें माझें प्रेमाचें वर्तन असे त्यामुळें, गैर-माहित लोकांना फारच आश्चर्य वाटे. कित्येक वेळां म्हाताऱ्या स्त्रीपुरुषांनीं असेही उद्गार काढावे कीं, "हा साहेब फार चांगला दिसतो. हा दुसऱ्या साहेबांसारखा उर्मट आणि दांडगा नाहीं!" मीं प्यासेंजर गाईडचा पोषाख केला म्हणजे मला, बहुत गैरमाहित लोक, मीं साहेबच आहें असें समजत!

एक वेळीं अशी मौज झाली कीं, एक म्हातारी ब्राह्मणी, अगदीं लवलेली, अशी गाडींत बसण्याकरितां आली. गाडी सुटण्याला अगदीं थोडा अवकाश राहिला होता. तें पाहून मीं त्या बाई-जवळ जाऊन तिला म्हटलें: "आजीबाई, मी तुमचें ओझें घेतों, म्हणजे तुम्ही जलदीनें गाडींत बसाल. गाडी अत्तां सुटल." आणि असें म्हणून मीं तिचें गाठोडें घेण्यास पुढें हात केला. तों ती ओरडून म्हणाली: "अरे मेल्या, मला शिवूं नकोस. तूं साहेब, अन् माझ्या देवांच्या संबळीला शिवलास म्हणजे आम्हाला कसें चालेल?" मग तिनें संबळी मात्र आपल्या हातीं घेतली व तिचें ओझें मी तिच्या-

पुढें गाडींत नेऊन ठेविलें व तिला बसायला जागा दिली. आणि ती बसल्यावर तिला सांगितलें कीं, आजीबाई, मी साहेब नाहीं; मी ब्राम्हणच आहें आणि, तिचा संशय फिटण्याकरितां मी आपली शेंडी व जानवें तिला दाखविलें; तेव्हां तिची खात्री झाली कीं, आपल्याला विटाळ झाला नाहीं! म्हातारी गाडींत बसायला आली ती जणूं काय सोंवळ्यांतच बसण्यासाठीं आली होती असें तिला वाटलें कीं काय कोण जाणे! असो. अशा अनेक गमती माझे संबंधानें होत. त्याचें कारण इतकेंच कीं, मी सर्व उतारूंशीं फार सौम्यतेनें व प्रेमानें वागें. अशा प्रकारची वर्तणूक रेल्वे खात्यांत बहुतकरून कोणाचेच दृष्टीस पडत नाहीं. ती माझेमध्यें बघून लोकांना आश्चर्य वाटे; आणि सर्व नेटिव लोक मजवर प्रीति करीत. कोणीही स्टेशनावर आला म्हणजे त्यानें अगोदर माझा शोध करावा. त्याप्रमाणें, माझे संबंधाची लोकप्रीति स्टेशनावरील गोऱ्या बालबच्चांस सहजच कळून येऊन त्यांना मजविषयीं अतिशय मत्सर उत्पन्न होत चालला!

मि. बेकर हे सज्जन स्टेशनमास्तर लवकरच बदलले जाऊन त्यांचे जागेवर मि. रोब्याटम् ह्या नांवाचे गृहस्थ आले. हे स्वभावतः चांगले आहेत; परंतु जरा बुधप्रकृतीचे आहेत. बुधप्रकृति म्हणजे वाचकांस माहीत असेलच; बुधग्रहाची अनुकूलता

किंवा प्रतिकूलता, त्याचे संनिध असणाऱ्या दुसऱ्या ग्रहांचे अनुकूलतेप्रमाणें किंवा प्रतिकूलतेप्रमाणें असते, असें ज्योतिषशास्त्राचें मत आहे. त्याप्रमाणें, जीं मनुष्यें आपल्याजवळच्या लोकांचे मताप्रमाणें व कलाप्रमाणेंच वागतात त्यांस बुधप्रकृतीचीं मनुष्यें ह्मणण्याची रीति आहे. त्यांत, सुदैवानें ह्या बुधप्रकृतीच्या मनुष्याचे सभोंवार चांगल्या बुद्धीचीं आणि सुस्वभावाचीं मनुष्यें असलीं तर त्याप्रमाणेंही त्या बुधप्रकृतीचे मनुष्यांचा वर्तनक्रम राहण्यास बिलकुल अडचण पडत नाहीं. परंतु जगामध्यें सुस्वभावी आणि सुबुद्ध अशीं माणसें फारशीं नसल्यामुळें, अशा बुधप्रकृतीचे मनुष्याकडून वाखाणण्यासारखीं कामें होत नाहींत, असा अनुभव अनेक प्रसंगीं येतो ! तसाच प्रकार मि. रोब्याटम् यांचे संबंधानेंही माझे अनुभवास आला. स्टेशनावर जीं युरेशियन पोरें टिकिटें गोळा करण्यास व कापण्यास वगैरे असतात त्यांणीं उतारू लोकांचा छळ केलेला माझ्यानें कधींही पाहवत नसे. व त्यासाठीं मीं अनेक वेळां स्टेशनमास्तर मि. रोब्याटम् यांचेकडे त्या दांडग्या पोरांवर तक्रारी न्याव्या. त्या तक्रारींची कधीं स्टेशनमास्तर यांणीं दाद घ्यावी; कधीं घेऊं नये; असा धरसोडीचा प्रकार चालला. असा प्रकार मि. बेकर यांचे अमलांत माझे अनुभवास आला नाहीं. मि. रोब्याटम् यांच्या अशा करण्यानें त्या हूड पोरांना एक प्रकारें उत्तेजनच मिळा-



ल्यासारखें होई व त्यांचे जास्त यथेच्छाचार बेलाशक चालत ! दिवसेंदिवस ह्या गोऱ्या पोरांकडून उतारूंचा जास्त छळ आणि अपमान होत चाललेला माझे दृष्टीस पडे; व तो माझ्यानें न पाहवल्यामुळें मी वारंवार मि. रोब्याटम् यांचेकडे जाऊन त्या पोरांवर तक्रार करीं. आणि त्या तक्रारीची मुळींच दाद न घेतां स्टेशनमास्तरांनीं मला तसेंच हिर्मुष्ट करून वाटेस लावावें. स्टेशनमास्तरांनीं मला असें हिर्मुष्ट करून वाटेस लावण्यांत मला कधीं फारसा खेद होत नसे; व त्याबद्दल मीं कधींही लाज बाळगली नाहीं. कारण, माझ्या ज्या ह्या तक्रारी स्टेशनमास्तराकडे हंमेषा जात त्या स्वार्थाकरितां नसून परार्थाकरितां असत. तेव्हां, त्याबद्दल मला वाईट वाटूं देण्याचें कांहींच कारण नव्हतें. मी मनांत असा विचार करीं कीं, मीं दहा वेळां परार्थाकरितां तक्रारी नेल्या तर स्टेशनमास्तर एक वेळ तरी त्या ऐकेल; व तेणेंकरून जो उतारूंचा यत्किंचित् छळ कमी होईल तेवढें आपल्या श्रमाला यश आलें असें समजूं. ह्याप्रमाणें, स्टेशनमास्तरानें कधीं मीं नेलेल्या तक्रारींची दाद घ्यावी व कधीं घेऊं नये.

ह्या गोऱ्या पोरांकडून उतारूंचे कसे छळ होत त्यांचे कांहीं प्रकार वाचकांना खुलासा व्हावा ह्मणून सांगतों: गाडीची अगदीं वेळ झाली असून, तिकिटें कांपून, प्लाटफार्मावर गाडींत बसण्याकरितां

उतारूंना सोडण्याचें ज्याचेकडे काम असेल त्याणें लवकर येऊन उतारूंना सोडावें. परंतु, गाडी सुटण्याला केवळ पांच मिनिटें अवकाश राहिला ह्मणजे ह्या पोरांनीं येऊन दारावर उभें राहावें, आणि त्यामुळें, उतारूंची अतिशय गर्दी होऊन त्यामध्यें मुलेंबाळें, वृद्ध आणि स्त्रिया यांची जी दुर्दशा होई ती कांहीं विचारूं नका ! ह्यापेक्षां १० मिनिटें अगोदर येऊन जर ह्या पोरांनीं आपलें काम केलें तर त्यांत त्यांना कांहीं कमीपणा कां येईल ? परंतु तसें केलें तर गरीब बिचाऱ्या नेटिव उतारूंचा छल करण्यास कसा सांपडेल ? गाडीची वेळ झाली ह्मणजे मीं स्वतः उतारूंकरितां त्या वेळीं कामावर येणाऱ्या पोराकडे जाऊन त्याला सांगावें. परंतु त्याणें आपल्या दिमाखांतच मला उत्तर द्यावें: थांबा, मला चहा घेतला पाहिजे; थांबा, मला पोषाख नीटपणें केला पाहिजे; थांबा, अजून पुष्कळ अवकाश आहे; इत्यादि. अशा रीतीनें उतारूंची हालअपेष्टा करण्याचे प्रसंग ह्या पोरांनीं तर नेहमीं आणावें; आणि त्याबद्दल माझा जीव नेहमीं कासावीस व्हावा ! परंतु करायचें काय ? ह्या संबधानें स्टेशनमास्तराकडे कित्येक वेळां तोंडीं कळविलें; परंतु तेथें तर बेदादराज्य होतें ! कारण. त्यांस आपल्या गोऱ्या मुलांचा विशेष पक्ष असल्यामुळें त्यांना माझे सांगण्याकडे तादृश लक्ष्य देववलें नाहीं !



ह्या पोरांकडून दुसऱ्या प्रकारचा असा छल होत असे कीं, कोणा उतारूचे बरोबर एखादें लहान मूल असलें व त्याचें टिकिट काढलेलें नसलें ह्मणजे पुणें स्टेशनावर टिकिट घेणारानें, त्या मुलाबद्दल टिकिट घेणें रास्त असतां घेतलें नाहीं म्हणून, त्यास अडवून त्याचेकडून त्याच्या भाड्याचे पैसे घ्यावे. येथपर्यंत सर्व गोष्टी रीतीप्रमाणेंच होत येतात. परंतु, पुढें त्या मुलाबद्दल दिलेल्या पैशांची पावती घेण्याकरितां त्या मुलाचा पालक उभा राहिला ह्मणजे त्याला दोन दोन तासपर्यंत ह्या टिकिटें घेणाऱ्या पोरांनीं पावती न देतां तसेंच खोळंबून धरावें. रात्रीची वेळ किंवा पाऊस पडत असला ह्मणजे त्या बिचाऱ्या मुलाच्या बापास किंवा आईस दोन तासांनीं स्टेशनावरून शहरांत येण्याकरितां गाडी मिळण्याची आशा नसते. आणि ते उतारू नवनिच असले तर गाडीवांचून त्यांची जी दुर्दशा होत असेल ती तर पुसूंच नका. अशा वेळीं, त्या फसलेल्या उतारूंची मी कींव बाळगून त्या पोरांकडे जाऊन सांगूं लागलों ह्मणजे त्यांनीं ह्मणावें कीं, आमचे हातांत असलेलें काम झाल्याशिवाय आह्माला पावती देण्यास फावत नाहीं. आणि यामुळें, कित्येक वेळां कित्येक उतारू पावतीची आशा सोडून कंटाळून आपला रस्ता सुधरीत. मग अर्थातच मुलाचे टिकिटाबद्दल घेतलेले पैसे रेल्वे कंपनीकडे जमा होत किंवा टिकिट कले-

कटराचे खिशांत पडत ह्याबद्दलचा मला विचार करण्याचें कारण नाहीं. कारण, मला कंपनीनें आपल्या नफानुकसानीवर लक्ष्य ठेवण्यासाठीं नेमिलें नव्हतें; तर, उतारूंच्या सोयीसाठीं माझी नेमणूक झाली होती. तेव्हां अव्यापारेषु व्यापार करण्याचें मला मुळींच प्रयोजन नव्हतें. या गोऱ्या पोरांकडून बायकामनुष्यांचा छल विशेषेंकरून होत असलेला माझे दृष्टीस पडे; आणि त्यासाठीं माझा जीव विशेष व्याकुल होई !

एकदां एका दांडग्या गार्डानें पुण्याचे स्टेशनावर एका मुसलमान औरतेच्या अंगावर हात टाकिला. व त्याबद्दलचा मोठा गवगवा होऊन, त्या संबंधानें त्याच वेळीं पुणेंवैभव पत्रांत त्याचे बातमीदारानें ती सर्व हकीगत छापली होती; व पुढें ती सरकारचे कानापर्यंत जाऊन तिकडून कंपनीकडे चौकशी वगैरे चालली होती. पुढें त्या चौकशीचा काय परिणाम झाला तो कळला नाहीं. परंतु, वरील सर्व हकीगत वर्तमानपत्रांत कशी प्रसिद्ध झाली हें मि० रोब्याटस् यास मोठें गूढ पडलें. त्यांना, ही सर्व हकीगत प्रसिद्ध करणारा मीच, असा दृढतर संशय आला; व त्याबद्दल त्यांनीं मला प्रत्यक्ष विचारिलें ! पुणें स्टेशन ह्मणजे कांहीं झांकलेलें व तेथें अमुकच मनुष्यें येतात असा अर्थ नाहीं. वर्तमानपत्रकारांचे बातमीदार अनेक ठिकाणीं व अनेक रूपानें फिरत असतात व ते अशा बातम्या तावडतोब

आपआपल्या पत्रांत प्रसिद्ध करतात, ह्या रीतीविषयीं मि० रोब्याटम् अज्ञान असावे अशी माझी कल्पना झाली. ह्यापूर्वींही अनेक वेळां रेल्वेकडील बेबंदाईच्या चरचरीत हकीकती पुण्याच्या पत्रांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. एके वेळीं ज्ञानचक्षूंतही पंढरपूरची स्पेशल गाडी सोडण्यांत पुण्याचे स्टेशनावर जो स्वेच्छेचा आणि निष्काळजीचा प्रकार झाला तो सर्व खुलासेवार येऊन त्याबद्दल सरकारांतून कंपनीकडे विचारण्यांत आलें होतें. इत्यादि वर्तमानपत्रांतून पुण्याचे स्टेशनावरील अव्यवस्थेविषयीं जो गवगवा होई, तो करण्यास मीच कारण आहें अशी कोणीं नीच स्वभावाच्या मत्सरी लोकांनीं मि० रोब्याटम् यांची समजूत केली; आणि त्या खोट्या समजावर त्यांणीं, वर लिहिल्याप्रमाणें, माझा संशय घेऊन एकदम मला विचारलें कीं, तूं वर्तमानपत्रांचा बातमीदार असून ह्या स्टेशनावरच्या बातम्या तूं प्रसिद्ध करतोस, अशी माझी खात्री आहे. मि० रोब्याटम् यांचें कोण हें अज्ञान आणि काय हें धाष्टर्य !

पुणें स्टेशनावर तिसऱ्या वर्गाचे उतारूंना बसण्याची नीटशी सोय नाहीं, तेथें उतारूंना पाणी पिण्याचे फार हाल होतात, इत्यादि गोष्टींविषयीं येथील ज्ञानप्रकाश, श्रीशिवाजी, मराठा आणि ज्ञानचक्षु ह्या पत्रांतून अनेक सूचनापर लेख प्रसिद्ध झाले; व त्याप्रमाणें सरकारांतून रेल्वे

कंपनीकडे लिहून कांहीं जुजबी व्यवस्था करण्यांत आल्या. ह्या सर्व गोष्टींचे खेळ करणारा मीच असा आमच्या सुस्वभावी आणि बुधप्रकृति मि० रोब्याटम् साहेब बहादुरांची खात्री झाली ! ह्या सर्व गोष्टींत माझें कोणत्याही प्रकारें अंग नसतां, त्या मींच वर्तमानपत्रकर्त्यांना लिहिण्यास भाग पाडल्या, असा वृथा संशय मि० रोब्याटम् यांणीं कां घ्यावा याचें कारण मी वर लिहिलेंच आहे. त्यांना असा संशय येण्यास कोणी तरी नीच प्रकृतीचा एक किंवा अनेक मनुष्यें कारण झालीं असावीं, असा माझा तर्क आहे. इतकें मात्र खरें कीं, ह्या अशा रेल्वे कंपनीकडील उणपणाच्या गोष्टी प्रसिद्ध होऊन उतारू लोकांच्या जास्त जास्त सोयी व्हाव्या; आणि माझ्या अन्नदात्या रेल्वे कंपनीचा लौकिक व वाहवा हीं दिवसेंदिवस अधिकाधिक वाढावीं; अशी माझी मनःपूर्वक इच्छा होती. वरील गोष्टी जगापुढें वर्तमानपत्रांतून येण्यास माझा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नसतां तो संबंध जर माझे दुर्दैवानें माझेच डोक्यावर मि० रोब्याटम् साहेब न्यायबुद्धीनें स्थापूं लागले तर, त्यासंबंध तरी, मि० रोब्याटम् यांस एवढें अनिष्ट वाटण्यासारखें काय होतें ? व त्यांणीं त्या सर्व गोष्टी आपल्याला नावडत्या असल्याबद्दल मजशीं असें अमानुष वर्तन कां ठेवावें ? ज्या गोष्टींबद्दल वर्तमानपत्रांतून गवगवा झाला व ज्या उणीवी रेल्वे कंपनीला नाहीं-

ह्मा करणें भाग पडलें, त्या सर्व जशाच्या तशाच कायम राखण्यांतच मि० रोज्याटम् यांस कांहीं मोठेसें भूषण वाटत होतें कीं काय ? अथवा, त्या सर्व व्यंगतेच्या गोष्टी चालू ठेवणेंच मि० रोज्याटम् यांस आवडत होतें कीं काय ? काय असेल तें असो !

येणेंप्रमाणें वरिष्ठकनिष्ठांत जी घांसाघांस चालूं नये ती दुर्दैवानें माझे संबंधानें चालू झाली; व त्यामुळें आतां ह्या स्टेशनावर आणि ह्या हुद्याची नौकरी करणें चांगलें नाहीं, असें मला प्रतिदिवशीं जास्त जास्त वाटूं लागलें. हरएक कामांत तेढीच्या बोलण्याशिवाय बोलणें चालेनासें झालें. कोणतीही गोष्ट मी ह्मणेन तशी होतां उपयोगीच नाहीं असा एकंदर गोऱ्या मंडळीचा निश्चय झाल्यासारखा दिसूं लागला. ही तेढ कोणत्या तरी उपायांनीं कमी व्हावी ह्मणून, कांहीं दिवस मीं अत्यंत उदासीनतेत घालविले. परंतु त्या उदासीनतेनें मला जास्तच ताप होऊं लागला. मला माझे गरीब देशबांधव उतारूंचे अपमान व हाल बिलकुल पहावेनात. रेल्वे कंपनीचीं हजारों स्टेशनें आहेत व त्या सर्व स्टेशनांवरून केवळ धर्मराज्यच चालू असेल असें नाहीं. उतारूंचे हाल व अपमान स्टेशनांवरचे उर्मट व दांडग लहान मोठे गोरे अधिकारी अनेक प्रकारें करीत असतील व ते सर्व गरीब बिचारे उतारू निरुपायानें सहन करीत असतील. आणि, तसेंच, पुणें स्टेशनावरच्या अधिकाऱ्यांकडूनही प्रत्यक्ष किंवा अ-

प्रत्यक्ष हाल आणि अपमान जे उतारू लोकांस सोसावे लागतात ते तेही निमूटपणें सोसतात. तेव्हां, त्याविषयीं तिसऱ्या ठिकाणीं मीं आपल्या मनाला विनाकारण इतकें वाईट कां वाटूं द्यावें? असा मी अनेक प्रकारें विचार करीं. परंतु, नाहीं; तसा विचार करून माझें मन मला बिलकुल स्वस्थ बसूं देत नसे. मला इतकें तरी वाटे कीं, निदान, मी ज्या स्टेशनावर नौकर आहें त्या स्टेशनावर तरी उतारू लोकांनां हाल व अपमान सोसणें भाग पडूं नये. पण माझे इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी व्हाव्या अशा प्रकारचें पूर्वजन्मींचें किंवा ह्या जन्मींचें तपोबल माझे गांठीं बांधलेलें नसल्यामुळें, त्यासंबंधानें मला जो ताप आणि विषाद सोसावा लागे त्यास मला निमूटपणें सादर होण्याचें भागच अशा सारखें झालें !

अखेरीस, अशा रीतीनें, आपल्या मनाला न आवडणाऱ्या स्थितींतच पशूसारखें पडून राहून उदरभरणावर लक्ष देण्यापेक्षां, ह्या परवशतेपासून एकदम आपण दूर व्हावें असा मीं निश्चय केला. आपल्या मनाला न आवडणारी गोष्ट आपल्या डोळ्यांदेखत होऊं देणें बंद करण्याची आपल्यामध्यें शक्ति असेल तर तसें मनुष्यानें करावें; अथवा, दुर्दैवानें तशी शक्ति नसेल तर एकदम "दृष्टिआड सृष्टि" होऊं देण्याचें जें साधन आपले स्वाधीन असेल तें तरी करावें. त्याप्रमाणें, पहिली गोष्ट व्हावी असा माझे हातांत तर कांहीं अधिकार न-

व्हता; परंतु दुसरी गोष्ट होणें हें पूर्णपणें माझे स्वाधीन होतें. तेव्हां, तसें करून आपण दूर व्हावें; आपल्या दृष्टीआड मग कांहींच होईना; असा दृढ निश्चय करून, पुढें लिहिल्याप्रमाणें, ट्र्याफिक सुपरिंटेंडेंटकडे मीं राजीनामा लिहून पाठविलाः—

To,

H. H. SWAN Esq.

District Traffic, Sup. G. I. P. Ry,

BOMBAY.

SIR,

I beg to write the few lines, hoping that they shall meet with your kind consideration. The present state of things concerned with the Post of Passenger Guide, which I hold at Poona, compells me to resign the Company's Service. Kindly grant this as my one month's notice to the Company.

Yours Obediently,

*Poona*, 1st Sept. 1887. } KHANDERAO NARAYAN, Passenger Guide, *Poona*.

हा मीं राजीनामा पाठविला तेव्हां, मला असें वाटलें होतें कीं, राजीनामा पाहिल्याबरोबर वरिष्ठ अधिकारी मला राजीनाम्याचीं खरीं कारणें काय आहेत ह्मणून विचारतील; आणि तसें विचारिलें असतां तीं कारणें प्रत्यक्ष त्यांस आपल्याला कळवितां येतील. परंतु, तसा प्रसंग मुळींच आला नाहीं. राजीनामा आमचे बुधप्रकृति मि॰ रोब्याटस् यांचे

मार्फतच गेला. त्यांना, मीं राजीनामा देणें हें आली-
कडे इष्ट झालें होतेंच. तेव्हां, त्यांजकडून राजी-
नाम्याचीं कारणें विचारण्यांत येतील अशी तर मला
आशा नव्हतीच; परंतु, मुंबईच्या मुख्य ऑफिसां-
तील अधिकाऱ्यांकडून तरी माझीं खरीं कारणें वि-
चारण्यांत येतील असें मला वाटलें होतें. परंतु तेंही
कांहीं झालें नाहीं. माझा राजीनामा मुंबईस गे-
ल्याबरोबर तिकडून मला तारेनें विचारण्यांत आलें
कीं, तुम्ही एक महिना राहून नंतर चाकरी सोडून
जाणार अथवा आतांच्या आतांच दूर होणार ?
त्यावर मीं उत्तर पाठविलें कीं, रेल्वेकडील नौक-
रांचे जे हक्क आहेत ते हक्क जर बुडत नसतील तर
मला आजच्या आजच नौकरी सोडून दूर होण्या-
ची इच्छा आहे.

येथें रेल्वेकडील नौकरीचे हक्क ते काय अस-
तात तेंही थोडक्यांत कळविलें पाहिजे. राजी-
नामा दिलल्या नौकर मनुष्यांचा कंपनीकडे जो
फंड शिल्लक राहिलेला असतो तो सर्व, कांटा-
कांट न होतां व त्याचें व्याज वगैरे न बुडवितां हिशे-
बाप्रमाणें बरोबर देणें; नौकरांचे राहत्या
जागीं त्यांना पोंचविण्यासाठीं व त्यांचें सामानसुमान,
बायकापोरें वगैरेंची बोळवण बिनखर्चानें करण्यासाठीं
गाडीचा पास देणें; इत्यादि हक्क रेल्वेकडील नौ-
करांचे ठरलेले आहेत.

पुढें, ता. १६ सप्टेंबर, सन १८८७ रोजीं,

रेल्वे कंपनीकडून माझे जागीं दुसरा मनुष्य नेमला जाऊन तो माझें काम करण्यास पुणें स्टेशनावर दाखल झाला. त्यावरोबर, मी त्याचे स्वाधीन माझें काम करून स्टेशनवरच्या सर्व मंडळीस सलाम ठोकून आपल्या घरीं आलों. मीं आपल्या जागेचा राजीनामा दिला हें ऐकून कोणाही हिंदु व नेटिव बांधवांस वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. पुढच्या आठवड्यांत तर पुण्याच्या सर्वच पत्रांतून ह्याबद्दल दुःखोद्गार आणि रेल्वेकंपनीला दोष, असे प्रसिद्ध झाले. असो. मला जें माझें योग्य कर्तव्य तें करणें प्राप्त झालें. त्याचप्रमाणें, माझे देशबंधूंनां जें त्यांचें कर्तव्य करावयाचें होतें तें त्यांणीं केलें. माझे संबंधनें पुण्याचे लोकांचा जो एकंदर अनुकूल ग्रह झालेला मला दिसला तेंच माझ्या इतके दिवसांच्या सेवाचाकरीचें मला योग्य पारितोषिक मिळालें, इतकें समजून मला फार आनंद झाला. मी माझे खुषीनें, ही अत्यंत हीनता पदरीं येणारी नौकरी सोडून, स्वस्थ घरीं बसलों. मजवर कांहीं कोणत्याही प्रकारचा दोष किंवा आरोप येऊन मला नौकरींतून कमी केलें अथवा त्यासाठीं मला नौकरी सोडणें भाग झालें, असें नाहीं. आणि, ह्या सर्व स्वच्छतेच्या कारभारानेंच माझें मन, ही नौकरी गेली तरी शांत व समाधानी राहिलें. एरवीं इतकी शांति आणि समाधानिता, अशा नौकरीवरून दूर झालेल्यास कधींही मिळावयाची नाहीं, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हेच.

मी नौकरीचे पाशांतून दूर झाल्यावर, मला रेल्वे कंपनीकडून जो पास मिळाला त्या पासानें, मी माझा हिशेब वगैरे करून माझे शिलक असलेले पैसे व माझ्या नौकरीचें सर्टिफिकेट हीं आणण्यासाठीं दुसरेच दिवशीं मुंबईस गेलों. मुंबईस गेल्यावर, अ मच्या मुख्य आफिसामध्यें तरी कोणी मला माझे राजीनाम्याचें कारण विचारतील, असें मला वाटत होतें; परंतु तसें कोणींच कांहीं विचारलें नाहीं व मलाही मुद्दाम माझीं खरीं कारणें सांगण्याचें कारण पडलें नाहीं. हिशेब होण्यासाठीं मला ज्या ज्या आफिसांत जावें लागलें तेथें तेथें बिनबोभाट माझा हिशेब होऊन, माझे सर्व पैसे मला मिळाले. व त्याचप्रमाणें पुढें दिलेलें सर्टिफिकेट मिळालें:—

*CERTIFICATE.*

# G. I. P. RAILWAY.

No. 29. *Bombay, 20th Sept.* 1887.

This is to Certify that Khende Rao Narayan ( Staff No. 12796 ) has been in the service of the Great Indian Peninsula Railway Company, since Twenty-second, November, Eighteen, Seventy Six; and resigned on the Sixteenth, September, One Thousand, Eight Hundred and Eighty Seven.

During the period he has been employed as Foreman, Signaller, Assistant Station Master and Passenger Guide, and his general conduct has been good.

(*Sd.*) HENRY CONDER,
General Traffic Manager.

ह्या सर्टिफिकेटावरून मी कंपनीच्या मतानें कोणत्याही प्रकारें गैरशिस्त अथवा नालायक नौकर नव्हतों ; व तें तिणें आपल्या दाखल्यांत कबूल केलें आहे. असो. ह्याप्रमाणें, "रेल्वेकंपनीचा नौकर" अशा नात्याचा जो माझा आजपर्यंत अवतार असे तो संपला; व मला जें स्वातंत्र्य भोगण्यासाठीं मनुष्याचे जन्मास ईश्वरानें घातलें आहे तें स्वातंत्र्य भोगण्याला मीं आपल्याला पात्र करून घेतलें. एकप्रकारें, मी आपल्या डोक्यावरची जबाबदारी उतरून ठेवून आतां अगदीं निष्काळजी व निर्भय झाल्यासारखा झालों. मला हा दिवस मोठ्या आनंदाचा असा भासला !

येणेंप्रमाणें, रेल्वे खात्यांतील सुखदुःखाच्या अनुभवाचें हें लहानसें आविष्करण मीं माझे देशबंधूंपुढें ठेविलें. हें आविष्करण माझ्या छोट्याशा सुदतीमधलें आणि लहान सहान अधिकाराच्या संबंधांतलेंच आहे. यापेक्षां मोठ्या अधिकारांत आणि जास्त मुदतींत ह्या सुखदुःखानुभवाचें प्रमाणही मोठें असावयाचें हें उघडच आहे. परंतु तसा थोर अधिकार आणि पुष्कळ मुदत माझे वांट्यास न आल्यामुळें,

विष्करण केलें. हें कित्येकांचे मतानें कांहींच नसेल, अथवा कित्येक समाग्यांच्या अनुभवाप्रमाणें कदाचित् जास्तही असेल. परंतु, रेल्वेखात्यांत नेटिवांना परमावधीच्या गैरसोयी, अपमान आणि दुःखें भोगावीं लागतात, हें तर कोणाच्यनेंही नाकबूल करवणार नाहीं. रेल्वेखात्यांत सुख काय तें गोऱ्या व निमगोऱ्या युरोपियन व युरेजियन लहान मोठ्या नोकरांना. नेटिवें ह्मणजे केवळ मजूरदार. गोरीं व निमगोरीं बाळें ह्मणजे रेल्वे कंपनीचीं अधिदैवतें. भाग्यच तसें त्या बाळांचें. कारण, रेल्वे कंपनी जर गोरी आणि ख्रिस्ती धर्मी आहे, तर, तिणें आपल्या जातिधर्माच्या व रंगाच्या लेंकरांचा अभिमान धरूं नये असें ह्मणणेंही बरोबर होणार नाहीं ! तेव्हां, चालू आहे हाच क्रम नेहमीं असाच राहावयाचा हें उघड आहे ! परंतु असें होतां उपयोगी नाहीं. ह्या सर्व आविष्करणाचा हेतु इतकाच आहे कीं, कंपनीचें न्यायान्यायाकडे किती लक्ष्य आहे व त्यावरून तिचेविषयीं लोकाभिप्राय काय होईल ? जी. आय्. पी. आर. कंपनी फार मोठी व श्रीमान् आहे. तिचे पदरीं लाखों नेटिवांचें अन्न आहे. व त्याप्रमाणें ती त्यांस पोसते आहे. परंतु ह्यामध्येंच जर तिणें, मी पुढें सुचवितों अशा प्रकारच्या करवतील तितक्या सुधारणा करण्याचा प्रयत्न केला तर, रेल्वे कंपनीचे राज्यास सर्व लोक दुवा व आशीर्वाद

देतील आणि तिचे जास्त जास्त भरभराटीला व ऐश्वर्यवृद्धीला तिच्या ह्या सुधारणा विशेष कारण होतील. ह्या सूचना रेल्वे कंपनीला स्वतःला असून त्यांत सरकारालाही कांहीं सूचना आहेत. त्यांचा सरकारानेंही आवश्य विचार करावा. कारण, रेल्वे कंपनीला सरकार ज्या अर्थीं जबाबदार आहे त्या अर्थीं, सरकारानें आपल्या रयतेच्या सुखसोयींकरितां रेल्वे कंपनीला वाटेल तसें वांकवून तिचकडून आपल्या सूचना अमलांत आणविल्या पाहिजेत. व ह्या संबंधानें सरकाराला पूर्ण मुखत्यारी आहे. माझ्या सूचना पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१. रेल्वे खात्यांत जीं गोरीं व निमगोरीं ( युरोपिअन व यूरोजिअन ) पोरें लाविलेलीं असतात त्यांचे जागीं प्रौढ वयाचे, पोक्त आणि कुटुंबवत्सल गोरे किंवा निमगोरे लोक लावावे. मग त्यांस पगार जास्त द्यावे लागले तरी चिंता नाहीं. पोरें अज्ञान, हूड, मूर्ख आणि सोटभैरव असल्यामुळें, त्यांच्यांकडून रेल्वे कंपनीचे मुख्य आश्रयदात्यांशीं म्हणजे उतारू लोकांशीं रहावें तसें माणुसकीचें वर्तन राहत नाहीं. ते अत्यंत बेपर्वाईनें, आडदांडपणानें आणि बेमुर्वतीनें वागतात. त्यांचे अंगीं नम्रता, सभ्यपणा, आणि पापभीरुता हीं बहुतेक नसतात. ह्यासाठीं पोक्त, प्रौढ आणि कुटुंबवत्सल लोक त्यांचे जागीं नेमण्याची विशेष जरूरी आहे. टिकिटें गोळा करण्याच्या जागेवर तर नेटिव लोकच

२. टिकिटें घेतलेल्या प्यासेंजर लोकांची कोंडी करून अगदीं गाडीच्या वेळेवर त्यांस प्ल्याटफार्म-वर सोडण्याची जी रीति आहे ती फार वाईट आहे, येणेंकरून उतारूंचे फार हाल होतात. आणि त्यांची कोंडी करणारे मिजाशी लोकांस त्यांचे हाल करण्यास विशेष फावतें. तिकिटें घेतलेले उतारू लोक प्ल्याटफार्मवर जाऊन व्यवस्थेनें बसले ह्मणजे त्यांना गाडी आल्य वर यथाक्रम डब्यांत बसण्यासा-ठीं उगीच धांवाधांव करण्याचेंही कारण पडणार नाहीं. कारण, गाडी येत असतां कोणते डबे भर-लेले आहेत अथवा कोणते मोकळे असून कोण-त्यांत पातळी आहे हें, स्टेशनामध्यें गाडी येतां येतांच प्ल्याटफार्मवरून उतारू लोकांस पाहण्यास सांपडतें व तेणेंकरून एकंदर होणारा घोंटाळा अग-दींच टाळला जाण्याचा संभव आहे. प्ल्याटफार्मवर त्यांना व्यवस्थेनें बसविण्यास रेल्वेपोलिस असतेंच.

३. स्टेशनां स्टेशनांवरून उतारू लोकांस बसण्या-साठीं तिन्ही ऋतूंत उपयोगी पडतील अशा प्रतीक्षा-गृहांची ( वेटिंग रूम्सची ) योजना रेल्वेकंपनीनें भरपूर केली पाहिजे. कारण, चोहोंकडे ह्या प्रती-क्षागृहांविषयींची हांकाटी फार आहे. त्याचप्रमाणें, जेथें त्यांची सोय केली असते तेथें तीं उतारूंना पुरेशीं आणि व्यवस्थित नसतात. पावसाळ्यांत उ-तारूंना पाऊस खावा लागतो, उन्हाळ्यांत ऊन सो-

… डाच्या दिवसांत थंडीनें कुडकुडत बसावें लागतें. तेव्हां, तिसऱ्या वर्गाचे गरीब उतारूंच्या सुखसोयींकडे हल्लीं जें अत्यंत दुर्लक्ष्य दिसतें तें अत्यंत निंद्य आहे. त्यामध्यें वर लिहिल्या प्रकारची सुधारणा रेल्वेकंपनीनें अवश्यमेव केली पाहिजे. आणि, कंपनी जर ह्या संबंधाची सुधारणा करणार नाहीं तर तिज-कडून ती सरकारानें करविली पाहिजे.

४. सरकारच्या शिफारशीनें उतारू लोकांचे सुख-सोयींसाठीं अलीकडे रेल्वेप्यासेंजर्स गाइड ह्मणून स्वतंत्र मनुष्यांच्या योजना होऊं लागल्या आहेत. ह्या नेमणुका रेल्वेकंपनीकडूनच ज्या होतात तशा न होतां, त्या सरकारमार्फत व्हाव्या. ह्मणजे, निवडणूक करून गाईड नेमण्याचें काम सरकारानें आपले हातीं ठेविलें पाहिजे. गाईड नेमणें ते हुशार, वि-द्वान् आणि दोन तीन भाषा जाणणारे असले पा-हिजेत. प्रत्येक ठिकाणीं एक एकच गाईड नेमण्याची नेहमीं वहिवाट आहे. ती मोडून, स्टेशनमास्तरांप्रमाणेंच दोन दोन गाईड नेमण्यांत आले पाहिजेत. हल्लींची गाईड यांची नेमणूक ह्मणजे अगदीं पारतंत्र्याची आहे. तें त्यांचें पारतंत्र्य मोडून, ते हल्लींपेक्षां सरका-रचे एक प्रकारचे स्वतंत्र नोकर होतील, अशा रीतीचें त्यांच्या अधिकारास रूप दिलें पाहिजे. त्यांचा ट्र्याफिक सुपरिं. शीं स्वतंत्रपणें पत्रव्यव-हार चालण्याची सवड राहिली पाहिजे. प्यासिंजर्स गाईड ह्मणजे, स्टेशनावरील इतर नोकरांप्रमाणेंच

स्टेशनमास्तरच्या ताब्यांतील एक नौकर, अशी जी हल्लीं त्यांची स्थिति आहे, तीपेक्षां ते वर लिहिल्या प्रकारच्या योग्यतेचे सरकारी अधिकारी आहेत, असें त्यांस स्वरूप आलें पाहिजे. असें करण्यांत सरकार आपल्या रयतेची विशेष काळजी बाळगतें असें होऊन, उतारू लोकांस ज्यास्त सुखसोयकर होईल. दोन दोन गाईड नेमले गेले ह्मणजे हल्लींचा त्यांचे कामाचा अनियमितपणा मोडला जाऊन त्यांचे नौकरीस कांहीं तरी नियमितपणाचें रूप येईल. एक एकच गाईड असल्यामुळें त्याला रात्रंदिवस मिळून १२ किंवा १८ तास जें हल्लीं काम पडतें तें कमी होऊन, विभागिलें जाईल; व ८।८ किंवा १०।१० तास काम करण्याची त्यांजकडे जबाबदारी राहील. ह्या सूचनेचा सरकारानेंच मुख्यत्वें विचार करून तो रेल्वेकंपनीकडून अमलांत आणविण्याची व्यवस्था राखिली पाहिजे.

५. कंपनीच्या रात्रपाळीचे कांहीं लोकांस १२।१२ तास काम करावें लागतें. त्यांस मदत देऊन त्यांना विश्रांति मिळण्याची फुरसत व सवड केली पाहिजे. रात्रीच्या कामाकडे गुंतलेल्या लोकांचे कसे हाल होतात, हें ह्या आविष्करणांत मीं खुलाशानें दर्शविलें आहेच. तेव्हां, ह्या सूचनेचा रेल्वेकंपनीनें जरूर विचार केला पाहिजे.

६. रेल्वे कंपनीनें तिसऱ्या वर्गाचे डब्यांत लघ्वीची सोय अवश्य केली पाहिजे. आलीकडे प्रयत्न केला होता. परंतु, सरकारचा नुकताच ठराव बाहेर पडला आहे त्यावरून, ह्या कामांत सरकार मन घालून रेल्वे कंपनीस हें काम करण्यास भाग पाडील असें दिसत नाहीं. परंतु, कंपनीनें सरकारच्या दपटशाची किंवा हुकुमाची वाट न बघतांच आपल्या उतारूं लोकांचे सुखासाठीं ही सोय करणें अगदीं जरूर आहे. इतर रेल्वेमध्यें उतारूंच्या जितक्या जितक्या सोयी करवतील तितक्या तितक्या करण्याकडे अधिकाधिक लक्ष्य दिलें जात असलेलें दिसतें; परंतु ह्या कामांत आमची जी. आय्. पी. रेल्वे कंपनीच काय ती अत्यंत उदासीन दिसते! हें चांगलें नाहीं.

७. कंपनीनें आपल्या बजेटाप्रमाणें सर्व नौकर लोकांचे पगार द्यावे. व हा नियम सक्त रीतीनें अमलांत आला पाहिजे. बजेटांत पगारांच्या अवाढव्य आकारण्या होऊन, त्याप्रमाणें नौकरांस पगार मिळत नाहींत, हें चांगलें नव्हे.

८. कंपनीचे अंमलदारांकडे नौकर लोकांच्या बहाली बडतर्फीचा जो अधिकार आहे तो सरकारानें आपल्याकडे ठेविला पाहिजे. रेल्वे कंपनीकडून नौकर लोकांचा फार छळ होतो. सरकारानें रेल्वे कंपनीची हमीदारी आपल्या शिरावर घेतली असून, त्या हमीदारीप्रमाणें सरकारानें, कंपनीकडून मिळणाऱ्या आपल्या रयतेचे सुखदुःखाकडे बिलकुल

लक्ष्य देऊं नये, हें चांगलें नाहीं. उलटीं कोंबडीं धरून चालविलीं, आपल्या बैलांस पराणी टोंचली, अथवा आजारी किंवा लंगडें जनावर कामास लाविलें, तर दयाळू सरकारचे जीवसंरक्षक कायदे लगेच आपला अंमल करण्यास पुढें येऊन, त्या जनावरांचा छळ करणाऱ्यांस दंडितात. परंतु, तेंच दयाळू सरकार, आपल्या रयतेकडून कंपनी कोणत्या प्रकारचीं कामें वगैरे घेत आहे व त्यामध्यें आपल्या मानव जातीय रयतेला कसकशा प्रकारें वागवून घेण्यांत येतें, याबद्दल कांहींच लक्ष्य देत नाहीं; हें चांगलें नव्हे. हें सरकाराला कळत नसेल असेंही ह्मणवत नाहीं. आणि, ह्यासाठीं, रयतेच्या पक्षानें सरकारानें, रेल्वेकडील नौकर लोकांच्या बाहाली-बडतर्फीचा अधिकार आपल्याकडे राखून ठेवावा. ह्मणजे त्या नौकर लोकांस एक प्रकारची शाश्वति आणि भरंवसा आल्यासारखा होईल; व त्या बहाली बडतर्फीमध्यें कांहीं तरी न्यायमनसोबा राहील. हल्लींसारखें केवळ वरिष्ठांच्या हुंकारमात्रावर बहाली किंवा बडतर्फीचें अवलंबन राहणार नाहीं. आणि,

९. इतर कारखानदार कंपन्यांवर सरकारचे पाहणी-दार असल्यामुळें, गिरण्यांतून वगैरे कामें करणाऱ्या लोकांस कोणत्या रीतीनें त्या कंपन्या वागवितात या संबंधानें त्या पाहणीदारांची देखरेख असते. त्यां कंपन्यांचे मजुरदारांस ८ तासांवर सरकार कामें करूं देत नाहीं व त्यामुळें त्यांस पुष्कळ विश्रांति व सुख

मिळतें. सरकारानें अशा प्रकारचीच आपली देखरेख आपले पाहणीदार नेमून रेल्वे कंपनीच्या एकंदर खात्यांचे संबंधानें राखली पाहिजे. रेल्वे कंपनीला सरकारानें फारच मोकळें सोडलें असल्यामुळें, तिच्याकडून वाटेल तसा मनस्वीपणाचा आणि धरसोडगिरीचा कारभार फार चालतो. तर, सरकारानें ह्याबद्दलचा आवश्य विचार करण्यासारखा आहे. रेल्वेकंपनीचे नौकरांस किती व कसें काम करावें लागतें हें, माझे ह्या आविष्करणांत वर्णिलें आहे त्यावरून समजेल.

रेल्वे कंपनीनें व सरकारानें ह्या सूचनांचा विचार केल्यास त्यांत कंपनीचा लौकिक जास्त वाढून, लोकांच्या प्रवासांत सौख्य आणि सोयी जास्त होतील. आणि आजपर्यंत आमच्या रेल्वे कंपनीची जी बदनामी अल्प कारणासाठीं होत आहे ती होण्याचें बंद राहील. मी ज्या कंपनीच्या अन्नावर १०।११ वर्षें पोसलों गेलों त्या माझ्या अन्नदात्या रेल्वे कंपनीचें जेणेंकरून हित होऊन, माझे अनुभवाप्रमाणें, माझ्या देशबंधूंना जेणेंकरून सुखसोयी मिळतील, त्या करण्याबद्दलच्या ह्या सूचना देण्याचा मीं अल्प प्रयत्न केला आहे. माझ्या ह्या एकंदर आविष्करणानें आणि हितपर सूचनांनीं रेल्वे कंपनीला आपल्या चालत आलेल्या वर्तनक्रमांत फेरफार करण्याची सुबुद्धि झाली अथवा दयाळू सरकारानें तशी सुबुद्धि रेल्वे कंपनीला प्रेरित केली, तर, मीं केलेल्या ह्या अल्प प्रयत्नाचें सार्थक्य झालें असें होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. १९३२१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)